## नेमणे आहे

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com



# दैनिक जनता आवाज








अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १०३ मंगळवार, दि. ०३ जुन २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये


## संमिश्र

### रायगडावर सापडले ऐतिहासिक यंत्रराज

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हापूर :** भारतीय पुरातत्त्व विभाग व रायगड विकास प्राधिकरणाकडून रायगडावर सुरू असलेल्या उत्खननात यंत्रराज हे ऐतिहासिक खगोलशास्त्रीय उपकरण सापडले आहे. माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी स्वतः ही माहिती दिली आहे. या यंत्राचा वापर अक्षांश, रेखांश, कर्कवृत्त, विषुववृत्त या सारख्या गोष्टींचा अभ्यास करणे सोपे व्हावे म्हणून वापर केला जात असे. दुर्गराज रायगडाचे बांधकाम करीत असताना खगोलशास्त्रीय अभ्यास करण्यासाठी या यंत्राचा वापर झाला असण्याची शक्यता आहे, असे ते म्हणालेत.

### साकिब नाचनच्या घरावर छापा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**ठाणे :** मुंबईत २००२-०३ मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटप्रकरणी शिक्षा भोगून तुरुंगातून सुटलेला साकिब नाचन पुन्हा एकदा दहशतवादी कारवायांमध्ये सक्रिय झाल्याचा संशय व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने काल सकाळी पडघा (ता. भिवंडी) येथे नाचनच्या घरावर छापा टाकून तपास सुरू केला आहे.

### विराट कोहलीच्या पबवर कारवाई

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बंगळुरू :** क्रिकेटपटू विराट कोहलीच्या बंगळुरूमधील वन८ कम्यून पब आणि रेस्तराँविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. क्यूबन पार्क पोलिसांनी मंगळवारी स्वतःहून दखल घेतली आणि पबमध्ये स्मोकिंग झोन नसल्याने कारवाई केली. विराटचा वन८ कम्यून पब एमजी रोडवर आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, पबमध्ये कायद्याचे नियमांचे उल्लंघन केले जात होते.

### कोरोनाच्या रुग्णात झपाट्याने वाढ?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** देशात कोरोना विषाणूचे रुग्ण झपाट्याने वाढत आहेत. सक्रिय रुग्णांची संख्या ३९७६ वर पोहोचली आहे. आरोग्य विभागाच्या वेबसाइटनुसार, १० दिवसांत १५ पटींनी वाढ झाली आहे. केरळ मध्ये सर्वाधिक १४३५ रुग्ण आहेत. सक्रिय रुग्णांच्या बाबतीत महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे.




# आम्ही सुख-दु:खात एकमेकांसोबत

## दोन्ही पवार एकत्र येण्यावर अजित पवारांचे वक्तव्य



जनता आवाज वृत्तसेवा

**पुणे : मागील काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याबाबत चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहेत. पुण्यात रविवारी शरद पवार आणि अजित पवार एकाच व्यासपीठावर दिसल्याने पुन्हा एकदा या चर्चांनी जोर धरला आहे. यावर बोलताना अजित पवार म्हणाले, आमचे विचार वेगवेगळे असले, तरी कुटुंब म्हणून सोबत असतो. घरातील कार्यक्रमाला आम्ही एकत्र येतोच. ते आज बारामतीत माध्यमांशी बोलत होते.**

पुण्यातील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट मध्ये साखर उद्योग व कृषी क्षेत्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराबाबत आयोजित एका कार्यक्रमात अजित पवार आणि शरद पवार यांनी सहभाग घेतला होता. यावेळी शरद पवार, अजित पवार आणि शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांच्यात बंद दाराआड चर्चा झाली, अशी माहिती आहे. या भेटीनंतर पुन्हा एकदा दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चांना उधाण आले.

साखर संकुलात विविध नेत्यांसोबत बैठक सुरु होती. त्यावेळी अजित पवार बंद दाराआड चर्चा करत होते, अशी बातमी कुणीतरी दिली. अरे काय चर्चा? तंत्रज्ञानाचा वापर करुन शेतकऱ्यांचे उत्पादन कसे वाढेल याबाबत चर्चा झाली, असे अजित पवार यांनी यावेळी स्पष्ट केले.

दोन्ही पवार कुटुंब एकत्र येण्याबाबत भविष्यात काय चित्र दिसेल, असा प्रश्न माध्यम प्रतिनिधींनी अजित पवारांना विचारला असता, माझ्या मुलाच्या साखरपुड्याला ते सगळे आले होते. घरातील कार्यक्रम असतील, तर त्याठिकाणी कुटुंब म्हणून आम्ही एकत्र येतोच. विचारधारा वेगवेगळी आहे. परंतु कुटुंब म्हणून बाकीच्या बाबतीत सुख-दु:खात एकमेकांसोबत असतोच, अशी प्रतिक्रिया अजित पवारांनी दिली. रायगड पालकमंत्रीपदाच्या वादाबाबत अजित पवारांना विचारले असता, ते म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी आजच रायगड पालकमंत्रीपदाबाबत म हत्त्वाची प्रतिक्रिया दिली आहे. पालकमंत्री असो किंवा नसो, त्या जिल्ह्यांच्या कामकाजांवर कुठे परिणाम झालाय का? नाही झालाय. त्यामुळे आपण काळजी करू नका. राज्याच्या प्रमुखांनी सांगितले आहे.

### मी कशाला घोटाळा करेन : पवार

राज्य सरकारच्या लाडकी बहीण योजनेत मोठ्या प्रमाणावर अपात्र लाभार्थ्यांनी नोंदणी केली असून, या योजनेत घोटाळा झाल्याचा आरोप ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. यामुळे अजित पवारांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीही संजय राऊत यांनी केली. याबाबत आज पत्रकारांनी अजित पवारांना विचारले असता, मी कशाला घोटाळा करेन. आपण पहिल्यांदा अर्ज मागवलेले होते. त्यावेळेस वेळ कमी होता. अनेकांनी अर्ज भरले. निकषाबाहेर असणाऱ्यांनीही अर्ज भरल्याचे आता ते सर्व लक्षात येत आहे. जसे लक्षात येईल, तसे लाभार्थी कमी केले जात आहेत, असे स्पष्टीकरण अजित पवार यांनी दिले.

# बिबट्याचा पती-पत्नीवर हल्ला

## आ. लहामटेंकडून रुग्णांची विचारपूस



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** तालुक्यातील कोतूळ गावातील रेणूकानगर परिसरातील रहिवासी व शेतात मोलमजुरी करून उदरनिर्वाह करणारे शेतमजूर रामनाथ बबन आरोटे व लक्ष्मीबाई रामनाथ आरोटे या वयोवृद्ध पती-पत्नीवर एका बिबट्याने अंधारात घरात घुसून हल्ला केला. त्यात ते गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. शुक्रवारी (३० मे) रात्री ९ वाजताच्या सुमारास घडली.

यामुळे रेणूकानगर परिसरातील रहिवाशांमधे घबराट निर्माण झाली. स्थानिक नागरिकांनी तातडीने गंभीर जखमी अवस्थेतील या वयोवृद्ध पती-पत्नीस उपचारासाठी कोतूळ ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. जखमींवर उपचार करण्यात येत असून त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे.

रात्री नऊ वाजता लक्ष्मीबाई घराचे दार बंद करण्यास व कडी लावण्यास सुरुवात करणार, एवढ्यात रेणुकानगर भागात भक्ष्याच्या शोधार्थ असलेल्या एका बिबट्याने अंधारातच रामनाथ आरोटे यांच्या घराच्या उघड्या दरवाजातून आत प्रवेश केला. त्याने अंधारातच पान ४

# 'वापरा आणि वाऱ्यावर सोडून द्या'

## भरपाई निकष बदलाच्या निर्णयावर आ. पवारांची टीका

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारने अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या नुकसान भरपाईच्या नियमांत मोठा बदल केला आहे. यावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. हे सरकार शेतकऱ्यांना वापरा व वाऱ्यावर सोडून द्या अशा प्रकारे वागवत आहे. त्यामुळेच या सरकारने नुकसान भरपाईच्या नियमांत बदल केला आहे, असे ते म्हणालेत.

रोहित पवार म्हणाले की, राज्य सरकारची शेतकऱ्यांबाबतची भूमिका म्हणजे 'गरज सरो वैद्य मरो' अशीच झाली आहे. निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देताना मतांवर डोळा ठेवून निर्णय घेणारे महायुती सरकार आज सत्तेत येताच शेतकऱ्यांच्या जीवावर उठणारे निर्णय घेत आहे. विधानसभा निवडणुकीच्या आधी १ जानेवारी २०२४ रोजी राज्य शासनाने शेतकऱ्यांना अवकाळीमुळे होणारी नुकसानभरपाई देताना त्यात प्रति हेक्टरी जिराईतसाठी ८५०० वरून १३६०० पर्यंत वाढ केली, तर बागायतीसाठी १७००० रुपयांवरुन २७००० रुपयांपर्यंत वाढ केली होती.

त्यानंतर नोव्हेंबर २०२४ मध्ये विधासभा निवडणूक सरताच आणि सत्तेवर येताच सरकारची गरजही पान ४



### शेतकऱ्यांना मदत करुन दिलासा द्या

आज रोजी राज्यात सध्या तब्बल ५५ हजार हेक्टर शेतीचे नुकसान झाले. अशा परिस्थितीत या नुकसानीचे शासनाने तत्काळ पंचनामे करून १ जानेवारी २०२४ च्या शासन निर्णयानुसारच शेतकऱ्यांना मदत करुन दिलासा द्यावा, अशी मागणी रोहित पवार यांनी केली आहे.

# जिल्हा गोळीबाराने हादरला

## जामखेडपाठोपाठ नगरमध्येही गोळीबार



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** सावेडी उपनगरातील तपोवन परिसराततील ढवण वस्तीवर दोन गटात झालेल्या वादातून बंदुकीतून गोळीबार झाल्याची घटना समोर आली आहे. यामध्ये एकजण गंभीर जखमी झाला आहे. याबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राहुल सांगळे, मयूर फणसे, आकाश नसाने, कुमार मराठे, भीमराज आव्हाड असे गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. याबाबत जखमी प्रमोद राम दास घोडके (वय.२४ रा. तपोवन, अहिल्यानगर) असे जखमी व्यक्तीचे नाव आहे. ही घटना सोमवारी रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास तपोवन परिसरात घडली. या घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी याबाबत तिघांना ताब्यात घेतले आहे.

जामखेड येथील विंचरणा नदीच्या नवीन पुलावर रविवारी रात्री दहाच्या सुमारास तीन अज्ञात व्यक्ती लघुशंका करत असताना फिर्यादीने येथे लघवी करू नका, महिला आहेत, असे म्हणाल्याचा राग आल्याने फिर्यादीस शिवीगाळ पान ४

# कोरड्या घोषणा नको, कर्जमाफी जाहीर करा

## काँग्रेस नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचा पत्रकार परिषदेत सवाल



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** महाराष्ट्राला मान्सूनपूर्व पावसाने झोडपले असून सलग तीन आठवडे पाऊस पडत होता. शेतकऱ्यांचे मालाचे प्रचंड नुकसान झाले आहे. जनावरांच्या चाऱ्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. आधीच संकटात असलेल्या शेतकऱ्याला अवकाळी पावसाने पुन्हा संकटात टाकले आहे. शेतकरी हा अर्थव्यवस्थेचा कणा आहे. या संकटात त्याच्या पाठीशी सरकारने उभे राहिले पाहिजे म्हणून पंचनाम्याचे सोपस्कार बाजूला ठेवून तातडीने हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत करावी, अशी मागणी काँग्रेस पक्षाची असल्याचे महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सांगितले.

मुंबई, गांधी भवन येथे पत्रकार परिषदेत बाळासाहेब थोरात पुढे म्हणाले की, मे महिन्यात काही पीके काढणीला येतात तेव्हाच पावसाने सर्व वाहून नेले, केळी, केसर आंबा फळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यात भाजीपाला, टोमॅटो, कांदा, डाळिंब पिकाचेही नुकसान झाले आहे. घरांची पडझड झाली. काही ठिकाणी पशुधन गेले. पावसामुळे जनावरांच्या चाऱ्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. रस्त्यांचे पान ४

### कृषिमंत्र्यांनी संवेदनशिलपणे बोलावे

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या वादग्रस्त वक्तव्यावर बोलताना बाळासाहेब थोरात म्हणाले की, शेतकरी संकटात असताना त्याला आधार देण्याची गरज असते, आपण पालक आहोत अशी विधाने करून दुखवू नये, संवेदनशीलपणे वागले पाहिजे. कृषीमंत्री हे पद महत्वाचे आहे, मी स्वतः या विभागाचा सहा वर्ष मंत्री होतो, शरद पवार केंद्रीय कृषी मंत्री होते पण कोकाटे यांनी ती ओसाड गावची पाटीलकी का वाटते हे माहित नाही. कृषी मंत्रालय ओसाड गावची पाटीलकी आहे तर मग बागायती विभाग कोणता हे त्यांनी सांगावे.

# मला युवाशक्तीचा सार्थ अभिमान

## आ. अमोल खताळ; तरुणांचा शिवसेनेत प्रवेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** संगमनेर शहर आणि तालुक्यामध्ये अनेक युवक कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करत आहे. तालुक्यात युवाशक्ती भगव्या खाली एकवटत आहे. याचा मला सार्थ अभिमान आहे, असे प्रतिपादन आ. अमोल खताळ यांनी केले.

संगमनेर येथे नुकतीच शिवसेनेची युवक निर्धार बैठक पार पडली. या बैठकीमध्ये शशिकांत दायमा, अजित भारते, अनिरुद्ध वालझाडे, ओंकार शिंदे, ओंकार जंगम, विजय वालझाडे, अजय वालझाडे, आदित्य जोर्वेकर, सौरभ वाकचौरे, रोहित भारती, मोहिज अत्तार, अक्षय संस्कर, शुभम क्षत्रिय यांच्यासह अन्य ५० ते ६० युवक कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्षामध्ये जाहीर प्रवेश करत भगवा हातात घेतला आहे. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी विविध मान्यवर उपस्थित होते.



आ. खताळ पुढे म्हणाले, काही दिवसांपूर्वी संगमनेर खुर्द येथील असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्या पाठोपाठ विविध गावातील शहराच्या विविध उपनगरातील युवक कार्यकर्त्यांनी सुद्धा शिवसेनेत प्रवेश केला आहे. येथून पुढील काळातही अनेक युवक कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत संगमनेर कार्यक्रम होणार असल्याचे आ. खताळ यांनी सांगितले.

# महानगर बँकेत गितांजली शेळकेंची वर्णी

## सर्वच १८ जागांवर दणदणीत विजय; ९ सभा व मतदारांशी सातत्याने संपर्क

जनता आवाज वृत्तसेवा

**पारनेर : शेड्युल दर्जा असलेली सॉलिसिटर गुलाबराव शेळके महानगर बँकेच्या झालेल्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणूकीत संचालिका गितांजली उदयराव शेळके यांच्या नेतृत्वाखालील सॉलिसिटर गुलाबराव शेळके संस्थापक पॅनलने विरोधी बँकेच्या अध्यक्षा सुमनताई गुलाबराव शेळके यांच्या नेतृत्वाखालील सॉलिसिटर गुलाबराव शेळके व सुमनताई शेळके पॅनलच्या सर्वच्या सर्व १८ उमेदवारांचा मोठ्या मताधिक्याने पराभव करत सर्वच जागांवर प्रचंड मोठ्या फरकाने दणदणीत विजय संपादन केल्याने महानगर बँक परिवारात मोठा विजयाचा जल्लोष साजरा करण्यात येत आहे.**



संचालिका गितांजली शेळके यांनी निघोज येथे श्री मळगंगा देवीचे दर्शन घेऊन पहिल्या पण मोठ्या सभेने शुभारंभ केला. तदनंतर पुणे, पिंपरी चिंचवड, मुंबई अशा ७ सभा व पारनेर येथे शेवटची ९ वी पण विजयी सभा घेतली. महानगर बँकेच्या निवडणूकीत त्यांनी पहिल्या दिवसांपासून ते निवडणूकीच्या निकालापर्यंत विजयी घोडदौड सुरूच ठेवली. त्यांनी अक्षरशः पायाला भिंगरी लावून राज्याचे ज्येष्ठ नेते शरद पवारांपासून उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री गणेश नाईक, माजी मंत्री व बाळासाहेब थोरात, पुणे, मुंबईमधील सर्व आमदार, खासदार ते खा. निलेश लंके व आ. काशिनाथ दाते यांच्यापर्यंत संपर्क साधत त्यांचा जाहिर पाठिंबा मिळवत त्यांना व त्यांच्या कार्यकर्त्यांना सक्रिय करत हा विजय साकार केला. त्यांच्या या विजयाच्या निमित्ताने महानगर बँक परिवारात दिवंगत गुलाबराव शेळके व उदयराव शेळके यांची आठवण सर्वांना येत आहे.

सॉलिसिटर गुलाबराव शेळके संस्थापक पॅनलचे सर्वसाधारण मतदार संघातून विजयी उमेदवार व त्यांना मिळालेली मते : सचिन अडसूळ १२६७२, रवींद्र ढोले १२३८९, गणेश गुंजाळ १२२९८, भास्करराव कवाद १२५१२, सतीश खाणकर १२५८८, कुंदा खोसे १२१२९, मंगेश खोसे १२७२३, श्रीधर कोठावळे १२५३२, बबनराव लंके १२६१३, संतोष पठारे १२५४३, गितांजली शेळके १३०१७, पांडुरंग शिंदे १२३३५, शंकर शिंदे १२३४८, मंगलदास थोरात १२३३६, इतर मागासवर्गीय मधून भिवाजी थोरात १३३३४, महिला राखीवम धून गितांजली शेळके १२५५५, छाया वाढवणे ११८८४, भटक्या जमातीमधून विलास पालवे १३४८५ विजयी झाले. तर मागास वर्गीय मतदारसंघातून संतोष रणदिवे यांची बिनविरोध निवड झाल्याने सर्वच १९ जागा जिंकून महानगर बँकेची सत्ता ताब्यात घेतली.

तर सॉलिसिटर गुलाबराव शेळके व सुमनताई शेळके पॅनेलच्या पराभूत उमेदवार व त्यांना मिळालेली मते अशी : विष्णू भगत ३४२०, किसनराव भोसले ३३१०, विजय चत्तर ३३४१, गितांजली डेरी ३४०७, राजेश डेरे ३३३९, सुरेश ढोमे ३३४३, भानुदास हडवळे ३१९३, शिवाजी लावंड पान ४

# टेम्पो-ट्रॅव्हलरचा अपघात

## चौघांची प्रकृती चिंताजनक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी तालुक्यातील येळी शिवार येथील कल्याण-विशाखापट्टणम् राष्ट्रीय महामार्गावर रविवारी पहाटे दोन ते तीनच्या सुमारास टेम्पो ट्रॅव्हलर बसचा (एमएच २० डीडी ०९६१) भीषण अपघात घडला.



पाथर्डीकडे येत असलेल्या प्रवासी वाहनाचा चालकाचा ताबा सुटल्याने बस रस्त्याच्या खाली जाऊन पलटी झाली. या अपघातात दहा प्रवासी जखमी झाले असून, त्यातील चार जणांची प्रकृती गंभीर असल्यामुळे त्यांना पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथे हलवण्यात आले आहे.

अपघात पाथर्डी तालुक्यातील येळी ते भुते टाकळी दरम्यान येळी गावच्या शिवारात घडला. टेम्पो ट्रॅव्हलरमध्ये प्रवासी घेऊन जात असताना चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्यामुळे ती पलटी झाली. अपघाताची तीव्रता इतकी होती की, प्रवाशांना वाहनाबाहेर काढण्यासाठी स्थानिक ग्रामस्थांनी तातडीने मदतीस धाव घेतली. अपघातात जखमी झालेले प्रवासी पुढीलप्रमाणे : वरमाला भगवान पवार (वय ७०), आरती दिनेश मालोटकर (वय ४०), रुद्र अनिल पिसाळ (वय १९), अनन्या विजय म्हस्के (वय १७), कुणाल संजय मिसाळ (वय २४), कविता संतोष पवार (वय ३५), पोर्णिमा संदीप शिंदे (वय ४२), पान ४

# राहाता मंडळ अधिकारी मोहसीन शेख यांची बदली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता :** राहाता महसूल मंडळाचे मंडळ अधिकारी मोहसीन शेख यांची अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात कर्जत येथे मंडळ अधिकारी म्हणून बदली झाली असून, त्यांच्या बदलीचा आदेश कळताच राहत्यातील नागरिक, विद्यार्थी आणि शेतकरी यांनी मोहसीन शेख यांची कार्यालयात प्रत्यक्ष भेट घेऊन व फोन करून राहता येथे दिलेले सेवेबद्दल सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

मोहसीन शेख यांनी राहाता तालुक्यातील राहाता आणि अस्तगाव मंडळाचे देखील काम पाहिले आहे. त्यामुळे त्यांचा शेतकरी वर्गाशी चांगला जनसंपर्क होता. त्यांच्याकडे आलेल्या कामाची ते तत्काळ दखल घेत असत. त्यामुळे ते कर्तव्यदक्ष आणि लोकप्रिय अधिकारी म्हणून प्रसिद्ध



> मागील चार वर्षाच्या कार्यकाळात राहाता मंडळामधील नागरिकांनी मला आपल्या कुटुंबातील सदस्याप्रमाणे सांभाळून घेतले. एवढे प्रेम मला माझ्या चौदा वर्षाच्या कारकिर्दीत कधीही मिळाले नाही. आजच्या निरोप समारंभाने मी भारावून गेलो आहे. बदली झाली असली तरी राहत्याप्रति जिव्हाळा कायम राहील.
>
> **– डॉ मोहसीन शेख, मंडळ अधिकारी, राहाता**

होते, त्यांच्या कार्यात नेहमीच प्रयोगशीलता असते.

शेख त्यांच्या बदलीची माहिती कळताच त्यांना अनेक नागरिकांनी प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा दिल्या. त्यांच्या कार्यालयातील टेबलवर असलेले शाल, श्रीफळ आणि फुलांचे गुच्छ सांगतात की, त्यांनी राहाता तालुक्याची सेवा किती प्रामाणिक आणि निष्ठेने केली असेल. महसुली विभागातील इतर कर्मचाऱ्यांनी देखील त्यांच्या कामाचा आदर्श घ्यावा.

# खा. लंकेंनी केली आरोग्य केंद्राची स्वच्छता

## नीलेश लंके प्रतिष्ठानसह आपला मावळा संघटनेकडून रस्त्यासह पुलांची दुरूस्ती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** आपत्तीग्रस्त खडकी, अकोळनेर, वाळकी, अस्तगांव, सारोळा कसार, भोरवाडी, जाधववाडी, सोनेवाडी या गावांमध्ये रविवारी नीलेश लंके प्रतिष्ठान तसेच आपला मावळा संघटनेच्या वतीने विविध रस्ते, पूल तयार करण्यात आले.

गेल्या आठवडयात मंगळवारी झालेल्या अतिवृष्टीमुळे या गावांतील रस्ते, पूल वाहून गेले. जनावरे दगावली. या आपत्तीनंतर खा. लंके यांनी या भागाची पाहणी केली. त्यावेळी त्यांनी संसार उघड्यावर पडलेल्या नागरिकांना किराणा तसेच जनावरांचा चारा उपलब्ध करून देत नागरीकांना दिलासा दिला.

विविध गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने खा. लंके यांनी संपूर्ण नुकसानीचा आढावा घेऊन नीलेश लंके प्रतिष्ठान तसेच आपला मावळा



संघटनेच्या माध्यमातून मदत मोहीम राबविण्याचा निर्णय घेतला. अनेक ठिकाणी रस्ते व पूल वाहून गेले होते, ते दुरूस्त करण्यात आले.

रविवारी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास सर्व गावांमध्ये एकाच वेळी या कामांना सुरूवात करण्यात आली. खा. लंके यांनी यावेळी विविध गावांमध्ये जात या मदतकार्यात सहभाग नोंदविला.

महेत्रे वस्तीला जोडणारे ३ पूल व रस्ता, जाधववाडीला जोडणारे वाहून गेलेले २ पूल, दरोडी मळयाला जोडणारा वाहून गेलेला २०० मिटर रस्ता, थोरात वस्तीला जोडणारा रस्ता,सारोळा रस्ता ते देशमुख मळा रस्ता. खेकड दरा, तरोडी वस्ती, नाणेकर वस्ती, गाढवे वस्ती, खडकी ते जाधव वस्ती रस्ते. बाजारतळावरील नदीलगतचा वाहून गेलेला भराव, जंदरे वस्तीवरील विविध रस्ते, पुरामध्ये वाहून गेलेल्या जनावरांची विल्हेवाट. नवीन खडकवाडीला जोडणारा

### यांत्रिक उपकरणे आणि ४०० स्वयंसेवक

५० जेसीबी, २२ ढंपर, ३० ट्रॅक्टर, ५ पोकलेनच्या मदतीने नीलेश लंके प्रतिष्ठान तसेच आपला मावळा संघटनेचे ४०० स्वयंसेवक तसेच स्थानिक कार्यकर्त्यांच्या मदतीने ही मोहीम राबविण्यात आली. याशिवाय या मोहीमेत सहभागी झालेल्या खाजगी व शासकीय डॉक्टरांच्या टीमने अतिवृष्टीमुळे ज्या ग्रामस्थांना आजार झाले आहेत, त्यांची तपासणी करून उपचार करण्यात आले, औषधेही देण्यात आली.

### आरोग्य केंद्राची स्वच्छता

वाळकी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये पूलाचे पाणी शिरल्यामुळे केंद्रात चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले होते. चार फुटापर्यंत पाणी साचलेल्या या केंद्रास खा. लंके यांनी भेट दिल्यानंतर त्यांनी स्वतः हाती खोरे घेत संपूर्ण केंद्रातील गाळ उचलण्यात आला. गाळ उचलण्यात आल्यानंतर संपूर्ण इमारत धुवून काढण्यात आली. पाणी शिरल्यामुळे आरोग्य केंद्रातील उपचार बंद होते. लंके प्रतिष्ठानची रूग्णवाहिका मागविण्यात येऊन येणाऱ्या रूग्णांवर उपचारही सुरू करण्यात आले.

पूल ९० टक्के वाहून गेला होता. तो पूल तयार करण्यात आला. वड वस्ती–खैरे वस्ती वाहून गेलेल्या रस्त्याबरोबरच मुरमीकरण करत छोटे मोठे रस्ते खुले करण्यात आले. खडकी ते जाधववस्ती अकोळनेर रस्ता. सारोळा कासार ते काळे मळा रस्त्यावरील पुल, दत्त मंदीर रस्ता, काळेवस्ती ते जाधववाडी रस्ता, स्मशानभूमी दुरूस्ती.

# सेवानिवृत्तीनिमित्त मनपाचे कर्मचारी आढावांचा सत्कार

## भिकादास आढाव यांच्या कामाचा आदर्श इतर कर्मचाऱ्यांनी घ्यावा : निकम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांनी आपल्या विभागातील ज्येष्ठ व निष्ठावान कर्मचारी भिकादास रामचंद्र आढाव यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी भव्य सत्कार समारंभाचे आयोजन केले होते. आढाव यांनी तब्बल ३९ वर्षे महापालिकेच्या विविध विभागांमध्ये सेवा बजावत आपल्या प्रामाणिक कार्याचा ठसा उमटविला.

भिकादास आढाव यांनी आपल्या सेवाकाळात १५ वर्षे पाणीपुरवठा विभागात,



१५ वर्षे अग्निशमन विभागात, तर ९ वर्षे उद्यान विभागात जबाबदारीने कार्य केले. त्यांचा कार्यकाळ संयम, समर्पण आणि कर्तव्यनिष्ठा यांचे प्रतीक ठरला आहे. त्यांच्या योगदानाचा गौरव करतांना उपस्थित सहकारी व अधिकाऱ्यांच्या चेहऱ्यावर कृतज्ञतेची भावना दिसून येत होती.

यावेळी जलअभियंता परिमल निकम, इंजि. गणेश गाडळकर, सदाशिव रोहकले, राहुल गीते, प्रदीप ढगे, आर. जे. मेहेत्रे, अफाक शेख, कैलास महामुनी, अभिजीत सपाटे, मिठू चौधरी, रामभाऊ कवडे, रवी कलोसिया, स्नेहल मुळे, अनिता ठुबे आदी

> भिकादास आढाव यांनी वसंत टेकडी येथील पाण्याच्या टाकीवर सेवा देत, शहरातील काही भागांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे नियोजन केले होते. पाणीपुरवठा सारख्या विभागामध्ये भिकादास आढाव यांनी कर्तव्यदक्ष राहत वेळेवर पाणीपुरवठा करण्याचे काम केले आहे. त्यांच्या कामाचा आदर्श इतर कर्मचाऱ्यांनी घेऊन पालिकेचे हित जोपासण्याचे काम करावे, तसेच नगरकरांना चांगल्या दर्जाची सेवा द्यावी.
>
> **– परिमल निकम, जलअभियंता**

मान्यवर कर्मचारी व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्कार समारंभात आढाव यांना शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्यासोबतचे अनुभव सांगून, त्यांच्या सेवेला मानवंदना दिली. आढाव यांनी यावेळी आपल्या भावना व्यक्त करत, सहकाऱ्यांचे आभार मानले आणि भावी आयुष्यासाठी शुभेच्छा स्वीकारल्या. सत्कार समारंभात विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी आपुलकीने सहभाग घेतल्याने वातावरण भारावून गेले होते.

# अहिल्याबाई होळकरांच्या विचाराची समाजाला गरज : ॲड. धायगुडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** समाजासाठी त्याग आणि समर्पण करणाऱ्या अहिल्याबाई होळकर व त्याचबरोबर सर्व महापुरुषांच्या विचाराची समाजाला गरज असून, समाजाने त्यांच्या विचारास अनुरूप आचरण करावे, असे आवाहन प्रख्यात नामवंत व्याख्याते ॲड. अविनाश धायगुडे यांनी केले.

लोकसेवा विकास आघाडीच्या वतीने स्व. भास्करराव गलांडे पाटील सभागृह, जिल्हा बँक, टाऊन शाखा श्रीरामपूर येथे आयोजित राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अशोक कारखान्याचे चेअरमन माजी आ. भानुदास मुरकुटे होते. तर व्यासपीठावर हिम्मतराव धुमाळ, सुरेश गलांडे, मंजुश्री मुरकुटे, ड. सुभाष चौधरी, व्हा. चेअरमन भाऊसाहेब हळनोर, डॉ. सुनिता गायकवाड, नाना पाटील, काशिनाथ गोराणे, गणेश छल्लारे आदी उपस्थित




> आज आपण जो पाणी आडवा, पाणी जिरवा प्रकल्प राबवित आहोत ते पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी ३०० वर्षांपूर्वीच राबविले आहे. थोर व महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी साजरी करीत असताना त्यांनी केलेले कार्य हे पुढील पिढीसाठी मार्गदर्शक ठरते. पुढच्या पिढीना त्यांनी केलेले कार्य आणि त्याग हे सांगण्याची आवश्यकता आहे.
>
> **– भानुदास मुरकुटे, माजी आमदार**

होते.

ॲड. धायगुडे पूढे म्हणाले, अहिल्याबाई ह्या समाजसुधारक व शुरविर होत्या. त्यांनी धर्मातील रूढी आणि परंपरांचा आंधळेपणाने कधीही स्वीकार केला नाही. त्यांनी एकच धर्म पाळला आणि तो म्हणजे मानवताधर्म. एकामागून एक दुःखे येत असतानाही अत्यंत धीराने आपली प्रजा सुखी,समाधानी आणि संपन्न बनवण्यासाठी स्वतः च्या दुःखाचा विचार न करता अहिल्याबाईंनी धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, बंधुता,समता व न्याय या तत्त्वाप्रमाणे राज्य केले.

यावेळी भाऊसाहेब उंडे, बाबासाहेब आदिक, रामभाऊ कासार, ज्ञानेश्वर काळे, संगीता शिंदे, शालिनी कोलते, भगवान सोनवणे, गणेश भाकरे, भगवान सोनवणे, नारायण बडाख, दशरथ पिसे, शनेश्वर पवार, नानासाहेब गांगड, जगदीश भावसार शंकरराव डहाळे आदी उपस्थित होते.

# रांजणगाव देशमुख–झगडे फाटा रस्त्याचे खड्डे बुजविण्यास प्रारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** कोपरगाव तालुक्यातील रांजणगाव देशमुख तालुका हद्द ते झगडे फाटा या रस्त्याची गेल्या अनेक दिवसापासून अत्यंत दयनीय झालेल्या रस्त्यावरील खड्डे बुजविण्याच्या कामास शुक्रवारी सुरुवात झाली असल्याची माहिती या रस्त्याचा कामासाठी पाठपुरावा करणारे सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब गव्हाणे यांनी दिली आहे.

या विषयी बाळासाहेब गव्हाणे यांनी अधिक माहिती देतांना सांगितले की, कोपरगाव तालुक्यातुन जाणारा राज्यमार्ग ६५ हा पुणे व संगमनेर या महत्वाच्या शहरांना डायरेक्ट जोडला जात असल्याने तसेच पोहेगाव सारखी मोठी बाजारपेठ या रस्त्यावर असल्याने या रस्त्याला मोठया संख्येने वाहनांची तसेच शालेय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची ये–जा असते. परंतु यातील रांजणगाव देशमुख तालुका हद्द ते झगडे फाटा या रस्त्याची गेल्या अनेक दिवसापासून अत्यंत बिकट अवस्था झाल्याने अनेकवेळा या रस्त्यावर छोटे मोठे अपघात हे नित्याचे ठरले होते. परंतु संबंधित प्रशासन हा रस्ता दुरुस्ती याकडे लक्ष देत नसल्याने अखेर स्थानिक नागरिकांना व वाहनधारकांना सोबत घेत मोठे आंदोलन करण्याचा इशारा दिला होता.



माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांची भेट घेत त्यांना सदर रस्त्याच्या परिस्थिती विषयी माहिती दिली असता डॉ. विखे यांनी लगेचच संबधीत विभागाच्या अधिकाऱ्यांना फोन करत तात्काळ सदर रस्ता दुरुस्ती करण्याच्या सूचना दिल्या असल्याची माहिती गव्हाणे यांनी दिली.

# पेन्शनवाढ प्रश्न केंद्रीय मंत्रिमंडळात उपस्थित करणार : खा. वाकचौरे



**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिरसगाव :** इपीएस पेन्शनर्स प्रश्नी मी सर्वोतोपरी प्रश्न सुटेपर्यंत व पेन्शनवाढ हातात पडेपर्यंत तुमचेबरोबर आहे. सर्व प्रकारचे मी सहकार्य करीन. मी दिल्लीत गेल्यावर मंत्र्यांची भेट घेईल व केंद्रीय मंत्रीमंडळात हा प्रश्न उपस्थित करणार आहे, असे प्रतिपादन खा. भाऊसाहेब वाकचौरे यांनी पेन्शनर्स बैठकीत केले.

पश्चिम भारत संघटक सुभाष पोखरकर प्रास्तविकात म्हणाले की आम्हाला पेन्शनवाढ दरमहा रु. ७५०० व महागाई भत्तासह मिळावी. आरोग्य सुविधा मिळावी, अशी मागणी असल्याचे सांगितले.

खा. भाऊसाहेब वाकचौरे यांना संसद भूषण पुरस्कार व अहिल्यानगर जिल्हाधिकारी यांनी विद्युत समितीवर अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल इपीएस ९५ पेन्शनर्स वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी शेकडो पेन्शनर्स उपस्थित होते.

खा. भाऊसाहेब वाकचौरे यांच्या निवासस्थानी पेन्शनर्स बैठकीत महाराष्ट्र प्रांतीय संघटक अजितकुमार घाडगे, खेड तालुकाध्यक्ष दिलीप कहाने, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष देवीसिंग जाधव, धुळे तालुकाध्यक्ष भोजू गिरासे आदींनी मनोगत व्यक्त केले.

आशाताई शिंदे यांना पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी बापूराव बहिरट, आशाताई शिंदे, संपत समिंदर, डी. एस. पवार, सुलेमान शेख, कटारिया, सुभाष आरसुले, साबळे, चिंतामणी, रायभान तुपे, अर्जुन जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

# ‘देवा भाऊ’ कुस्ती स्पर्धेच्या व्यासपीठाचे पूजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** शेवगावमध्ये काल देवाभाऊ कुस्ती स्पर्धेच्या व्यासपीठाचे पूजन करण्यात आले.

शेवगावमध्ये वंदे मातरम् तालीम वतीने देवा भाऊ कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. आज या कुस्ती स्पर्धेच्या व्यासपीठाचे पूजन शेवगावमधील खंडोबा मैदान येथे श्याम भारदे, एकनाथ शिरसाट, बबन धावणे, संजू



शेवाळे, डॉ. कृष्णा देहराय, क्षित्रे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी वंदे मातरम तालिमचे अध्यक्ष व भाजपाचे प्रदेश सरचिटणीस अरुण मुंढे, गणेश गर्जे, नंदू मुंढे, अर्जुन ढाकणे, अभय पालवे, पप्पू केदार, सालार शेख, अतुल भोकरे, विलास फाटके, श्याम कनगरे, कानिफ साखरे, छगनराव पानसरे, कडुभाऊ मगर, रमेश जाधव, रमेश ढाकणे, अंकुश कुसळकर, दिगंबर काथवटे, सुनील जगताप, बापू काळे, नंदू बैरागी, डॉ. निरज लांडे, बंडू गुळमकर, संजय राऊत, अजय भारस्कर, महेश मिसाळ, अंकुश ढाकणे, प्रताप बडधे सह आदी उपस्थित होते.

# निपाणी वडगावमध्ये अहिल्यादेवींना अभिवादन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वडाळा महादेव :** श्रीरामपूर तालुक्यातील निपाणी वडगाव ग्रामपंचायत या ठिकाणी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रसंगी सरपंच सविता देवकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले

याप्रसंगी ग्रामविकास अधिकारी प्रशांत दर्शने, चेअरमन संजय गायधने, पोलिस पाटिल चंद्रकला गायधने, भागचंद नवगिरे, विलास जाधव, योगेश देवकर, रवी पवार, मुरलीधर राऊत, यशवंत गायधने आबा राऊत, अण्णा मोरे, जगन्नाथ जाधव तसेच ग्रामपंचायतीचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# जॅकवेल पंप हाऊसकरीता दिली परवानगी

## खांबा गावाच्या उपसासिंचन योजनेसाठी मंत्री विखेंचा निर्णय; आ. खताळांच्या पाठपुराव्याला यश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** तालुक्यातील खांबे येथील कामधेनू सहकारी उपसा सिंचन योजनेसाठी आ. अमोल खताळ यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले असून, जॅकवेल घेण्यास जलसंपदा विभागाने मंजुरी दिल्याचे पत्र जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्वतः येवून ग्रामस्थाकडे सुपूर्द केले. जलसंपदाच्या निर्णायमुळे खांबा गावाच्या पाणी प्रश्नातील मोठा अडथळा दूर झाला आहे.

खांबा गावाला वर्षानुवर्ष पाण्यासाठी संघर्ष करावा लागत



आहे. पाणी प्रश्न सुटावा म्हणून ग्रामस्थांनी आग्रही मागणी मंत्री विखे पाटील यांच्याकडे विधानसभा निवडणुकीपुर्वी केली होती.

राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर आ. खताळ यांनी या मागणीचा पाठपुरावा जलसंपदा मंत्री विखे पाटील यांच्याकडे केल्यानंतर जलसंपदा विभागाने सादर झालेल्या प्रस्तावला शर्थी आणि अटी टाकून म्हैसगाव तास या पुलापासून मुळा धरणाच्या बुडीत क्षेत्रात साधारणपणे ५०ते ७५ मीटर अंतरावर मुळा धरणाच्या भीतींपासून २२ कि.मी. अंतरावर तीन गुंठे जागा जॅकवेल अप्रोच ब्रीज व पंप हाऊसचे काम करण्यासाठी जलसंधारण विभागास ना हरकत पत्र दिल्याने गावासाठी स्वतंत्र जॅकवेल घेण्याची मोठी अडचण दूर झाली आहे.

खांबा गावाचा पाणी प्रश्न सोडविणार, अशी ग्वाही मंत्री विखे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीपुर्वी गावात झालेल्या कार्यक्रमात दिली होती. आ. खताळ यांनी यासाठी केलेला

### खांबे गावाला मोठा दिलासा

सरपंच रविंद्र दातीर यांनी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आ. अमोल खताळ यांच्या सहकार्याने खांबे गावाला मोठा दिलासा मिळाला असून लवकर जॅकवेल आणि पंप हाऊसचे काम करून गावासाठी पाणी आणण्याचे स्वप्न पूर्ण करणार आहे.

> संगमनेर तालुक्यातील पठार भागाला पाणी मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते. त्याची सुरूवात झाली आहे. अजून या प्रश्नावर खूप काम करायचे असून जलसंपदा मंत्री विखे पाटील यांच्या सहकार्याने दिलेल्या आश्वासनाची नक्की पूर्तता होईल.
>
> **– अमोल खताळ, आमदार**

पाठपुरावा निर्णायक ठरला आहे. रविवारी मंत्री विखे पाटील आणि आ. खताळ व कार्यकारी अभियंता सायली पाटील यांच्या उपस्थितीत खांबा गावचे सरपंच रविंद्र दातीर आणि ग्रामस्थांना हे पत्र सुपूर्द करण्यात आले.

# पिचड यांचा पुतळा नवीन पिढीला प्रेरणादायी ठरेल : पालकमंत्री ना. विखे पाटील

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** स्वर्गीय मधुकरराव पिचड यांनी स्वकर्तृत्वावर राज्याच्या राजकारणात आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटवला. सत्तेत असो किंवा नसो, त्यांनी तालुक्याच्या व आदिवासी समाजाच्या प्रश्नांसाठी सदैव संघर्ष केला. ते अनुभव संपन्न नेते होते, अशा शब्दांत राज्याचे जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्व पिचड यांच्या अनेक आठवणींना उजाळा दिला.

निळवंडे धरणाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना जे पाणी जात आहे त्याचे सर्व श्रेय हे पिचड यांना असून त्यांचा पुतळा नवीन पिढीला प्रेरणादायी ठरेल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. सध्या अनेक लोक जलनायक झाले आहेत. परंतु निळवंडे धरणाचे खरे जलनायक हे पिचड आहेत. याचे सर्व श्रेय त्यांना जाते असे विखे म्हणाले.

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय अकोले येथे उभारण्यात येणाऱ्या स्वर्गीय मधुकरराव पिचड यांच्या नियोजित पुतळ्याचे भूमिपूजन व दहावी-बारावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ मंत्री विखे पाटील यांच्या हस्ते रविवारी (दि. १) पार पडला. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शेतकरी नेते दशरथ सावंत हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे हे होते. संस्थेचे कायम विश्वस्त तथा माजी आमदार वैभव पिचड, गिरजाजी जाधव, स्वीकृत विश्वस्त संपत वैद्य, सुरेश कोते, मधुकर सोनवणे, शिवाजीराजे धुमाळ, पूनम पिचड, डॉ. मधुरा पिचड, गिरीजा पिचड, यश पिचड, सिंधू उंबरे, संस्थेचे अध्यक्ष सुनील दातीर, सचिव सुधाकर देशमुख, खजिनदार धनंजय संत, कार्यकारिणी सदस्य सुधाकर आरोटे, आनंद नवले, रमेश जगताप, यशवंत आभाळे, डॉ. डी. के. सहाणे, शरद देशमुख, मच्छिंद्र धुमाळ, कल्पना सुरपुरिया, शिक्षणाधिकारी एस. पी. मालुंजकर, प्राचार्य डॉ. भास्कर शेळके, बी. जे देशमुख, सीताराम देशमुख, बाळासाहेब वडजे, सोनाली नाईकवाडी, गोरक्ष मालुंजकर, रावसाहेब वाळुंज, राजेंद्र डावरे, राजेंद्र देशमुख, भाऊसाहेबखरात, राहुल देशमुख, संदीप शेटे, संपत नाईकवाडी, शीतल वैद्य, वैष्णवी धुमाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

स्वर्गीय पिचड हे अकोले तालुक्यात जन्माला आले नसते तर काय झाले असते? असा सवाल करीत अकोल्यात मुखी पालन प्रशिक्षण केंद्र उभारावे त्यासाठी आपण सहकार्य करू असे आश्वासन कुलगुरू डॉ. सोनवणे यांनी दिले. स्वागत कार्यकारिणी सदस्य शरद देशमुख यांनी केले. प्रास्ताविक संस्थेचे माजी सचिव यशवंत आभाळे यांनी केले. सूत्रसंचालन सुप्रिया वैद्य व कोमल राठी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. अश्पाक पठाण यांनी करून दिला. आभार अध्यक्ष सुनील दातीर यांनी मानले.



मंत्री विखे म्हणाले की, स्वर्गीय पिचड यांनी तालुक्यात विकासाचा पाया घातला. जलमंदिरे उभारली, त्यांचा व आमच्या कुटुंबाचा दोन पिढ्यांचा वारसा आहे. राजकारणात मतभेद असतात पण मनभेद नसतात. स्वर्गीय खासदार विखे पाटील यांच्या आशीर्वादानंतर स्वर्गीय पिचड यांच्याकडे पाहत असल्याचे त्यांनी सांगितले. गोवारी हत्याकांडाच्या वेळेला आदिवासी विकासमंत्री म्हणून नैतिक जबाबदारी स्वीकारून त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. अलिकडच्या काळात राजकारणात असे उदाहरण दुर्मिळ आहे. अकोले तालुका डाव्या विचारसरणीचा असूनही सावंत यांच्यासारख्यांना बरोबर घेऊन त्यांनी काम केले. अकोले तालुक्यातील सहकारी संस्थांची निर्मिती करत त्यांचा विस्तार केला. अनेकांच्या हाताला काम दिले.

# महेश भागवत मानद डॉक्टरेटने सन्मानित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी तालुक्याचे सुपुत्र आणि सध्या तेलंगण राज्याचे अतिरिक्त पोलीस महासंचालक म्हणून कार्यरत असलेले महेश मुरलीधर भागवत (आय पी एस) यांना पुणे येथील डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या वतीने 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. सनदी सेवेत कार्यरत असतानाच अशी मानद पदवी मिळवणारे भागवत हे पाथर्डी तालुक्याचेच नव्हे तर संपूर्ण देशातील मोजक्या अधिकारी वर्गात गणले जातात.

भागवत यांनी त्यांच्या प्रदीर्घ आणि उल्लेखनीय कार्यकाळात सामाजिक न्याय, मानव तस्करी विरोधी मोहिमा, महिला व बालकामगार संरक्षण आणि शिक्षणासाठी केलेले कार्य लक्षणीय राहिले आहे. विशेषतः यूपीएससी परीक्षेची तयारी करणाऱ्या देशभरातील दोन हजारहून अधिक विद्यार्थ्यांना सतत केलेले मार्गदर्शन हे त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे जिवंत उदाहरण ठरले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत डी. वाय. पाटील विद्यापीठाने त्यांना हा बहुमान दिला आहे. पुणे येथे पार पडलेल्या या विशेष समारंभात डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, प्र-कुलपती डॉ. भाग्यश्री पाटील, डॉ. एन. जे. पवार, डॉ. सोमनाथ पाटील, डॉ. स्मिता जाधव, डॉ. यशराज पाटील आणि इतर मान्यवरांची उपस्थिती होती. या वेळी भागवत यांची पत्नी आणि तेलंगण राज्याच्या वन विभागाच्या अतिरिक्त मुख्य वनसंरक्षक सुनीता भागवत (आय एफ एस) याही उपस्थित होत्या.




# यश मिळविण्यासाठी चिकाटी आवश्यक

## मकरंद अनासपुरे; विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**तळेगाव दिघे :** यश मिळवण्यासाठी केवळ प्रयत्न करणे पुरेसे नाही, तर त्यात जिद्द आणि चिकाटी असणे आवश्यक आहे. जीवनात कठोर परिश्रम घेतल्यास निश्चित यश मिळतेच. त्यामुळे विद्यार्थ्यांनी यशासाठी कठोर परिश्रम घ्यावेत, असे प्रतिपादन प्रसिद्ध सिनेअभिनेते मकरद अनासपुरे यांनी व्यक्त केले.

संगमनेर तालुक्यातील तळेगाव दिघे येथे देवराम नारायण गोडगे सामाजिक प्रतिष्ठानतर्फे संस्कृती मंगल कार्यालयात आयोजित दहावी व बारावी परीक्षेतील विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणगौरव आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचालक भारत मुंगसे, शिवाजी गोडगे, तात्यासाहेब राम (दादा) गोडगे, प्रतिक दिघे, बाबासाहेब कांदळकर, राजेंद्र कहांडळ, नवनाथ जोंधळे, रामदास दिघे, सोपान जोंधळे, गणेश दिघे, संजय दिघे, शरद भागवत, प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार गोडगे, ॲड. अविनाश गोडगे, उत्तम जोंधळे, राहुल जगताप, विक्रम खांडरे, मीना इल्हे, राजेंद्र गुंजाळ, अरुण महाराज दिघे, शरद महाराज ढवळे, विलास जोर्वेकर, नंदकुमार दिघे, राजेंद्र दिघे आदी उपस्थित होते.

अनासपुरे म्हणाले, डॉ. नंदकुमार गोडगे हे प्रतिष्ठानच्या माध्यमातून करीत असलेले कार्य स्तुत्य आहे. चांगल्या कामाची दखल घेतल्यास त्यातून प्रेरणा मिळते. सामाजिक काम करणाऱ्या व्यक्तींना समाजाने पाठबळ देणे गरजेचे आहे. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार तसेच दहावी व बारावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. गोडगे यांनी केले. सूत्रसंचालन शरद महाराज ढवळे यांनी केले. ॲड. अविनाश गोडगे यांनी आभार मानले.

# व्यापारी गाळ्यांचा आठ कोटींचा लिलाव यशस्वी

## कर्जत कृषी उत्पन्न बाजार समितीचा ऐतिहासिक उपक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** कृषी उत्पन्न बाजार समिती, कर्जत यांच्या वतीने राशीन येथील जुन्या बैल बाजार परिसरातील व्यापारी गाळ्यांचा लिलाव तब्बल आठ कोटी रुपयांना यशस्वीपणे पार पडला. हा लिलाव बाजार समितीच्या उपबाजार समितीमध्ये नव्याने उभारण्यात येणाऱ्या व्यापारी गाळ्यांच्या अनुषंगाने घेण्यात आला.

बाजार समितीच्या कर्जत येथील कार्यालयात पार पडलेल्या या लिलावास सभापती काकासाहेब तापकीर व उपसभापती अभय पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या प्रसंगी संचालक बळीराम अण्णा यादव, नंदकुमार नवले, पप्पू शेठ नेवसे, वसंत कांबळे, मंगेश जगताप, रामदास मांडगे, तसेच बाजार समितीचे सचिव सतीश कदम आणि व्यापारी अक्षय राऊत प्रमुख उपस्थित होते.

या लिलावप्रक्रियेचे संचालन अधिकारी श्री. तनपुरे यांनी पार पाडले. लिलावात कर्जत, राशीनसह विविध परिसरातील आडते व्यापारी, इतर व्यापारी व शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कर्जत कृषी उत्पन्न बाजार समितीने अशा प्रकारचा उपक्रम प्रथमच राबवला असून, या यशस्वी लिलावाची सर्वत्र स्तुती व कौतुक होत आहे. व्यापारी गाळ्यांची कामे सध्या प्रगतीपथावर असून, लवकरच व्यापाऱ्यांना नवी सुविधा उपलब्ध होणार आहे.

राशीन जुना बैल बाजार या परिसरातील ५८ व्यापारी गाळे यांचा लिलाव बाजार समितीने उपसभापती व सर्व संचालक मंडळ यांच्या पुढाकारातून केला. यास अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला आहे. भविष्यात आणखीन व्यापारी गाळे निर्माण करून एक चांगली बाजारपेठ त्या ठिकाणी निर्माण करण्यात येईल. त्याचा शेतकरी नागरिक व व्यापारी या सर्वांनाच फायदा होणार आहे.

**-काकासाहेब तापकीर सभापती.**



# वाहनाला महावितरणची लामोटो तार गुंतली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी शहरातील वीर सावरकर मैदान परिसरात वीज वितरण महामंडळाच्या निष्काळजीपणामुळे गुरुवारी (दि. २९) सकाळी मोठा अपघात टळला. रस्त्यावरून जाणाऱ्या एका खासगी वाहनाच्या चाकाला विद्युत वाहक लोमोटी केबल गुंतल्याने भीषण परिस्थिती निर्माण झाली होती. सुदैवाने, चालकाने प्रसंगावधान राखून वाहन थांबवल्याने जीवितहानी टळली, परंतु यामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली.

या घटनेने परिसरात संतप्त प्रतिक्रिया उमटल्या असून, विद्युत महामंडळाच्या भोंगळ कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.वीर सावरकर मैदान हा पाथर्डीतील नागरिकांच्या वर्दळीचे प्रमुख केंद्र आहे. या परिसरातून जाणारी विद्युत केबल असुरक्षितपणे ती रस्त्यावर लोमली गेली होती. माणसाचा हात लागेल अशा पद्धतीने त्याची उंची होती. या निष्काळजी पणामुळे वाहनाला केबल गुतली आणि मोठा आवाज होऊन वाहन अचानक थांबले. स्थानिक नागरिकांनी यापूर्वीही अशा घटनांबाबत तक्रारी केल्या होत्या, परंतु विद्युत महामंडळाने ठोस उपाययोजना केलेल्या नाहीत, अशी खंत व्यक्त केली आहे.माजी नगरसेवक राम नाथ बंग यांनी ही बाब उजेडात आणली असून, विद्युत महामंडळाच्या निष्काळजीपणाचा जाहीर निषेध केला आहे. ''हा नागरिकांच्या जीवाशी खेळणारा प्रकार आहे



# खेडकर यांच्या आरोग्यासाठी महाआरती

**जनता आवाज वृत्तसेवा**



**पाथर्डी :** मनसेचे जिल्हाध्यक्ष देविदास खेडकर हे गेल्या अनेक वर्षांपासून कर्करोगासारख्या दुर्धर आजाराशी लढा देत आहेत. सध्या त्यांच्या प्रकृतीची स्थिती चिंताजनक असून, पुन्हा एकदा आजाराने डोके वर काढल्याने ते उपचाराखाली आहेत. त्यांच्या आरोग्यासाठी त्यांच्या पाथर्डी तालुक्यातील मूळगाव एकनाथवाडी येथे ग्रामदैवत मच्छिंद्रनाथ मंदिरात महाआरती व विशेष प्रार्थना करण्यात आली.

ही महाआरती निरंजन संस्थांचे मठाधिपती संतोष महाराज गीते यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. गावकऱ्यांनी एकत्र येत श्रद्धेने देवापुढे खेडकर यांच्या आरोग्यासाठी प्रार्थना केली. यावेळी गावात भावनिक वातावरण पाहायला मिळाले.तसेच ग्रामस्थांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे हिमोथेरेपी या अत्यंत महागड्या उपचारासाठी आवश्यक असलेल्या इंजेक्शनकरण्याची मागणी केली आहे. खेडकर यांच्यावर यापूर्वीही अनेक वेळा शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून, त्या त्यांनी यशस्वीपणे पार केल्या. मात्र कर्करोगाने पुन्हा त्रास देण्यास सुरुवात केल्याने ते सध्या कठीण संघर्ष करत आहेत.

# महावितरणच्या अधिकाऱ्यांवर हल्ला करणारे गजाआड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** महावितरणच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर हल्ला करून त्यांच्याकडील दोन हजार रूपये बळजबरीने काढून घेणाऱ्या दोघांना कोतवाली पोलिसांनी अटक केली आहे. सागर बाप्पुसाहेब म्हस्के व शेहबाज निसार सय्यद (दोघे रा. पाटील कॉलनी, म्हसोबा चौक, केडगाव) अशी त्यांची नावे आहेत.

३० मे रोजी महावितरणचे सहाय्यक अभियंता राहुल शीतराम शीलावंत (वय ३५, रा. शाहूनगर, केडगाव) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यांनी सांगितले की, पहाटे ०३:१५ वाजता रंगोली चौक, केडगाव येथे लाईटचा फॉल्ट तपासण्याचे काम करत असताना दोन इसमांनी येऊन शिवीगाळ करत दमदाटी केली. त्यांनी सरकारी कामात अडथळा आणत खिशातील दोन हजार रूपये जबरदस्तीने काढून घेतले. पोलिसांनी गुन्हा दाखल केला व गुन्ह्याचा तपास सुरू केला. तपासादरम्यान पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना माहिती मिळाली की संशयित आरोपी पळून जाण्याच्या तयारीत आहेत. त्यानुसार पोलिसांनी तत्काळ कांदा मार्केट रस्ता, केडगाव येथे सापळा रचला व तात्काळ कारवाई करत सागर बाप्पूसाहेब म्हस्के व शेहबाज निसार सय्यद यांना अटक केली. चौकशीत त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर अधीक्षक प्रशांत खैरे, उपअधीक्षक अमोल भारती, निरीक्षक दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक सपकाळे, अंमलदार पितळे, दळवी, दरंदले, दीपक रोहकले, तानाजी पवार, दत्तात्रय कोतकर, शिरीष तरटे, सुरज कदम, राम हंडाळ, सचिन लोळगे, महेश पवार व महिला अंमलदार नांगरे यांनी केली आहे.

# कासार समाजाचा वधुवर मेळावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** कासार सोशल ग्रुपच्या वतीने सोमवंक्षीय क्षत्रिय कासार समाजाचा वधु- वर परिचय मेळावा ६ व ७ जून रोजी महालक्ष्मी लॉन्स डी. पी. रोड राजाराम पुलाजवळ कर्वेनगर पुणे -५२ येथे संपन्न होणार आहे, अशी माहिती कासार सोशल ग्रुपचे अध्यक्ष सुनिलराव रासने उपाध्यक्षा अंजली कोल्हापुरे यांनी दिली.

पुणे शहरा सारख्या मेट्रोसिटीत 'निशुल्क' वधू-वर मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या वधूवर परिचय मेळाव्यास अहिल्यानगर जिल्ह्यातील समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अशोक कोळपकर, किशोर निनगुरकर, अजय कासार, गणेश कासार, सुनिल उंडे संजय वरशिंदकर संजय कोळपकर, सुभाष कुंभकर्ण आदिनी केले.

# मयत महिलेबाबत माहिती देण्याचे आवाहन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** वृद्ध महिला १४ मार्च रोजी एका रोड अपघात गंभीर जखमी झालेल्या एका महिलस उपचारासाठी पाथर्डी येथील उपजिल्हा रुग्णालय, दाखल करण्यात आले होते.

प्रथमोपचारानंतर त्यांना पुढील अहिल्यानगरच्या जिल्हा रुग्णालय येथे उपचारासाठी हलविण्यात आले होते. उपचारादरम्यान दि. ३१ मे रोजी सकाळी या महिलेस मृत घोषित करण्यात आले.पाथर्डी पोलीस स्टेशन येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मयत महिलेचे नाव गंगाबाई वासुदेव सरोदे (वय अंदाजे ८० वर्षे, रा. पंढरपूर संपूर्ण पत्ता उपलब्ध नाही) असे आहे. आजपर्यंत त्यांच्या नातेवाईकांचा शोध घेण्यात आलेला असूनही कोणीही संपर्क केलेला नाही. तरी, ह्या बेवारस मयत महिला कोणाची ओळखीची असल्यास किंवा त्यांचे नातेवाईक कोणास माहित असल्यास त्यांनी तात्काळ पाथर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे व तपासी अधिकारी पोलीस हेड कॉन्स्टेबल सुहास बटूळे या अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन पाथर्डी पोलीस स्टेशनकडून करण्यात आले आहे.

# गोळीबार करणारे ६ आरोपी जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कामगिरी!

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** जामखेड तालुक्यात एका तरुणावर फायरिंग झाल्याची वादग्रस्त घटना काल दि.०१ जून २०२५ रोजी उघडकीस आली. स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईत २४ तासांच्या आतच ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींवर खुनाचा प्रयत्न व आर्म ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार दिनांक १ जून २०२५ रोजी जामखेड मधील रा. पोकळेवस्ती, जामखेड येथील फिर्यादी आदित्य बबन पोकळे (वय २०) व साक्षीदार यांच्या सोबत रस्त्यावर लघवी करण्याच्या कारणावरून वाद उत्पन्न झाला. यावेळी काही अनोळखी व्यक्तींनी फिर्यादी व साक्षीदार यांच्यावर लाथा-बुक्क्या केल्याचा आरोप आहे. तसेच, आरोपींनी जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने फिर्यादी व साक्षीदार यांच्या दिशेने तीन गोळ्या उडवल्या. त्यापैकी दोन गोळ्या हुकल्या, तर एक गोळी फिर्यादीच्या मित्र कुणाल बंडू पवार याच्या पायाला लागली.

घटनेची माहिती लगेच मा. पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांना मिळाली आणि स्थानिक गुन्हे शाखेला तात्काळ तपास करण्याचा आदेश देण्यात आला. गुन्हे शाखेच्या नेतृत्वाखाली दोन विशेष पथक रवाना करण्यात आले. तांत्रिक व गोपनीय विश्लेषणाच्या आधारे आरोपींची ओळख करून ताब्यात घेतले.

प्रभु रायभान भालेकर (वय ३३, रा. निपाणी, छत्रपती संभाजीनगर), नकुल विष्णु मुळे (वय ४०, रा. खेर्डा, ता. पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर), शरद अंकुशराव शिंदे (वय ३८, रा. पुसेगाव, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर), गणेश गोविंद आरगडे (वय ३०, रा. खंडाळा, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर), रावबहादुर श्रीधर हारकळ (रा. सारासिध्दी सोसायटी, बीड बायपास, छत्रपती संभाजीनगर), सुशील ताराचंद गांगवे, वय ३०, रा.पद्मपुरा, छत्रपती संभाजीनगर) अशांना ताब्यात घेतले आहे.

सदर आरोपींनी वापरलेली कार आणि लायसन्स असलेले पिस्तूल, १ राऊंड व २ रिकाम्या पुंगळ्या असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ताब्यात घेतलेल्या आरोपींच्या खुलाशातून, प्रभु रायभान भालेकरच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमासाठी जमलेल्या गटाने ही फायरिंग केल्याची माहिती मिळाली आहे. सध्या जामखेड पोलीस स्टेशन हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहे. आरोपींवर खुनाचा प्रयत्न, आर्म ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पूर्ण होईपर्यंत गुन्ह्याची सर्व बाजूंची चौकशी सुरु आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे,पोलीस अप्पर पोलीस अधीक्षक, प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी गणेश उगले यांनी केलेली आहे.



# संपादकीय

## तीन तिघाडा, काम बिघाडा...

२०२१ मध्ये तालिबानने अफगाणिस्तानवर पुन्हा नियंत्रण मिळवल्यानंतर २०२५ पर्यंत इतर सर्व देशांप्रमाणे चीनने पुनर्स्थापित इस्लामिक अमिरातीला मान्यता दिली नाही, परंतु देशात त्यांच्या दूतावासाला काम करण्याची परवानगी दिली. मान्यता नसतानाही चीन तालिबान सरकारशी व्यापार, गुंतवणूक आणि मदतीच्या मुद्द्यांवर वाटाघाटी करतो. अफगाणिस्तानच्या खाण क्षेत्रातील सर्वात मोठे गुंतवणूकदार म्हणजे उझबेकिस्तान, तुर्की, चीन आणि इराणमधील कंपन्या; ज्यांनी तेल आणि वायू, सिमेंट प्रकल्प आणि तांबे, सोने आणि लोखंडाच्या खाणींमध्ये गुंतवणूक केली आहे. अफगाणिस्तानमध्ये तेलाचे साठेदेखील आहेत. विशेषतः उत्तर अफगाणिस्तानमध्ये, विशेषतः बल्ख आणि जाव्झान प्रांतांमध्ये अंदाजे १.८ अब्ज बॅरल तेल आहे. चीनची या तेलसाठ्यांवर आणि खाणींवर नजर आहे. या दृष्टीने पाऊल टाकत चीनने अफगाणिस्तानला चीन–पाक इकॉनॉमिक कॉरिडॉरमध्ये सामील करून घ्यायचा निर्णय घेतला आहे. समुद्र आणि जमिनीवर आधारित चीनच्या कॉरिडॉरचा मुख्य उद्देश मध्यपूर्वेतून चीनच्या ऊर्जाआयातीचा मार्ग सुरक्षित आणि कमी अंतराचा करणे हा आहे. मलेशिया आणि इंडोनेशियादरम्यान मलाक्का सामुद्रधुनीतून जाणारा विद्यमान मार्ग युद्धाच्या प्रसंगी बंद होऊ शकतो. त्यामुळे चीनच्या ऊर्जा–अवलंबित अर्थव्यवस्थेला धोका निर्माण होऊ शकतो. पाकिस्तान आणि चीनने चीन–पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर अफगाणिस्तानपर्यंत विस्तारित करण्यास सहमती दर्शवली आहे. तिन्ही राष्ट्रांमधील त्रिपक्षीय सहकार्य अधिक दृढ करण्याचे हे प्रयत्न असल्याचे चीन भासवत असला तरी भारताशी असलेले वैर आणि विस्तारवाद हा चीनचा छुपा अजेंडा आहे. चीन–पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर हा भारताच्या हद्दीत येणाऱ्या पाकव्याप्त काश्मीरमधून जात असल्याने भारतासाठी सार्वभौमत्व आणि सुरक्षेचे प्रश्न उपस्थित झाले आहेत. सीपीईसीचे काम भारताच्या सहभागाशिवाय प्रगतीपथावर असणे हा गंभीर चिंतेचा विषय बनला आहे. भारताला या त्रिकुटापासून सावध रहावे लागेल. तालिबानच्या नेतृत्वाखालील इस्लामिक अमिरात ऑफ अफगाणिस्तान आता सत्तेमध्ये चौथे वर्ष पूर्ण करण्याच्या तयारीत आहे. गेल्या चार वर्षांमध्ये या राजवटीपर्यंत भारताची पोहोच हळूहळू वाढत गेली. आता ती अधिक थेट पण सावध व्यावहारिक सहभागामध्ये रूपांतरित झाली आहे. परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर आणि आयईएचे अंतरिम परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्ताकी यांच्यातील अलिकडच्या फोनकॉलने या भागीदारीतील एक महत्त्वाचा टप्पा गाठला. भारत–अफगाणदरम्यानचे हे व्यापारी संबंध चीन आणि पाकिस्तानला सलत आहेत. भारताच्या परराष्ट्रमंत्रांनी पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा निषेध केल्याबद्दल मुत्ताकी यांचे आभार मानले आणि दोन्ही देशांमध्ये अविश्वास निर्माण करण्याच्या प्रयत्नांवर विश्वास न ठेवल्याबद्दल कौतुक केले. याला पाकिस्तानने केलेल्या दिशाभूल करणाऱ्या दाव्यांचा अप्रत्यक्ष संदर्भ आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारताने तालिबानला मानवतावादी आणि विकास सहकार्य हळूहळू वाढवण्याचे वचन दिले आहे.

या वर्षी जानेवारीमध्ये परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी दुबईमध्ये मुत्ताकी यांची भेट घेतली. ही दोन्ही बाजूंमधील सर्वोच्चस्तरीय बैठक होती. डिसेंबर २०२४ मध्ये हल्ले आणि प्रतिहल्ल्यांनंतर पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील संबंध बिघडल्यानंतर ही बैठक झाली. काबूलमधील पाकिस्तानचा प्रभाव कमी झाल्यामुळे भारताला आपला सहभाग वाढवण्यासाठी आणि या प्रदेशात आपले धोरणात्मक आणि सुरक्षा हितसंबंध अधिक चांगल्या प्रकारे सुरक्षित करण्याची संधी मिळाली. व्यापारासाठी अफगाणिस्तानच्या चाबहार बंदराचे महत्त्व, अफगाणिस्तानला मानवतावादी मदत पोहोचवणे आणि काबूलला इस्लामाबादवरील अत्यधिक अवलंबित्वातून मुक्त करणे यानिमित्ताने भारताने सहकार्याचे एक पर्व सुरु केले. आता भारताने या बाबींवर भर देऊन अफगाणिस्तानशी व्यापार संबंध बळकट करण्याची आवश्यकता आहे. अर्थात असे असले तरी, या प्रदेशातील इतर देश, खास करून चीन, तालिबान आणि अफगाणिस्तानशी संबंध प्रस्थापित करण्याकामी अधिक सक्रिय आहेत. रशियाने अलिकडेच तालिबानला दहशतवादी संघटनांच्या यादीतून काढून टाकले आहे. इराण आणि मध्य आशियाई प्रजासत्ताक, जसे की कझाकस्तान, उझबेकिस्तान, तुर्कमेनिस्तान, ताजिकिस्तान यांनीही अफगाणिस्तानशी संपर्क वाढवला आहे. तालिबानदेखील या घडामोडींचा फायदा घेत आहे, परस्पर हितसंबंधांवर आधारित तटस्थ परराष्ट्र धोरणाचा पुनरुच्चार करत आहे. आणि इथेच तीन राष्ट्रे एकत्र येण्याचा धोका सामावला आहे. चीन आपला आर्थिक कॉरिडॉर नजरेसमोर ठेऊन पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यामधील संबंध सुधारण्यासाठी मध्यस्थ म्हणून भूमिका पार पाडत आहे. म्हणूनच दोन पारंपरिक शत्रूंशी अफगाणिस्तानच्या वाढत्या जवळीकीकडे भारताला काटेकोर लक्ष द्यावे लागणार आहे. १० मे रोजी काबूलमध्ये पाकिस्तान आणि चीनच्या विशेष प्रतिनिधींच्या बैठकीनंतर पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री मोहम्मद इशाक दार आणि मुत्ताकी यांनी २०–२१ मे रोजी चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांच्याशी त्रिपक्षीय सल्लामसलत करण्यासाठी चीनमध्ये भेट घेतली. यावेळी त्यांनी आर्थिक तसेच संपर्क राखण्याच्या आघाड्यांवर सहकार्य वाढवण्याचे ठरवले आणि चीन–पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर अफगाणिस्तानपर्यंत विस्तारण्यास सहमती दर्शवली. भारताच्या दृष्टीने या निर्णयाला महत्व आहे. ही उपद्रवी राष्ट्रे एकत्र येत असल्याने अफगाणिस्तानशी असलेले संबंध वाढवण्याच्या दृष्टीने भारताची कसोटी लागणार आहे.

गेल्या साडेतीन वर्षांमध्ये अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधील संबंध लक्षणीयरीत्या बिघडले आहेत. मात्र तरीही दोन्ही बाजू प्रश्न सोडवण्याचा आणि एकमेकांशी पुन्हा संपर्क प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहेत. भारत आणि पाकिस्तानमधील संघर्षानंतर पाकिस्तान आणि अफगाणिस्तानला पुन्हा आपल्या हद्दीत समाविष्ट करण्याचा चीनचा प्रयत्न भारतासाठी अडचणीचा ठरू शकतो. भारताशी प्रस्थापित केलेले चांगले संबंध अफगाणिस्तानला पाकिस्तानपासून स्वावलंबन मिळवून देतात, परंतु तालिबानशी असलेले संबंध आपल्याला हवे असलेले फायदे देऊ शकतात का, यावर भारताची कडक नजर असणे आवश्यक आहे.

# भरारी एलआयसीची आणि अर्थव्यवस्थेचीही

**अर्थनगरीतून**
**– महेश देशपांडे**
**आर्थिक घडामोडींचे जाणकार**




चोवीस तासांमध्ये सर्वाधिक विमा पॉलिसी विकण्याचा 'एलआयसी' चा विश्वविक्रम अलिकडेच चर्चेचा विषय ठरला. त्याच वेळी चौथी मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या भारताच्या वाटेत अडचणी निर्माण करण्याबाबत अमेरिका, पाकिस्तान अपयशी ठरले. दरम्यान, कामगारांचे पगारापेक्षा सुविधांना प्राधान्य असल्याचे चित्र एका सर्वेक्षणातून पुढे आले. तसेच रिझर्व्ह बँकेच्या लाभांशाने संरक्षणक्षेत्राला बळ मिळणार असल्याचेही स्पष्ट झाले.

२४ तासात सर्वाधिक विमा पॉलिसी विकण्याचा 'एलआयसी'चा नवा विश्वविक्रम अलिकडेच चर्चेचा विषय ठरला. त्याच वेळी चौथी ताकदवान अर्थव्यवस्था बनण्याच्या भारताच्या वाटेत अडचणी निर्माण करु पाहणाऱ्या अमेरिका, पाकिस्तानच्या मनसुब्यावर भारताने पाणी फेरले. दरम्यान, पगारापेक्षा अन्य सुविधांना कामगारांचे प्राधान्य असल्याचे चित्र एका सर्वेक्षणातून पुढे आले. या व्यतिरिक्त रिझर्व्ह बँकेच्या लाभांशाने संरक्षणक्षेत्राला बळ मिळणार असल्याचे स्पष्ट झाले.

भारतीय जीवन विमा महामंडळ (एलआयसी)ने अलिकडेच एक मोठा विक्रम केला. 'एलआयसी'ने २४ तासात सर्वाधिक विमा पॉलिसी विकून एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. 'एलआयसी'च्या या विक्रमाची नोंद 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड'ने घेतली आहे. 'एलआयसी'च्या एकूण चार लाख ५२ हजार ८३९ एजंट्सनी संपूर्ण भारतात ५ लाख ८८ हजार १०७ जीवन विमा पॉलिसी विकून एक नवा विक्रम प्रस्थापित केला. या ऐतिहासिक कामगिरीची पुष्टी 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्डने' केली आहे. यासोबतच २० जानेवारी २०२५ रोजी 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्डस'ने 'एलआयसी'च्या नेटवर्कच्या उत्कृष्ट कामगिरीचे कौतुक केले आहे. देशभरातील एकूण ४५२८३९ एलआयसी एजंट्सनी ५८८१०७ जीवन विमा पॉलिसी विकून हा विक्रम साध्य केला आहे.

'एलआयसी'ने म्हटले आहे की २४ तासांच्या आत जीवन विमा उद्योगात एजंट उत्पादकतेसाठी एक नवीन जागतिक बेंचमार्क स्थापित झाला आहे. हे संस्थेच्या एजंट्सच्या समर्पणाचे, कौशल्याचे आणि अथक परिश्रमाच्या नीतिमत्तेचे एक शक्तिशाली प्रमाण असल्याची माहिती 'एलआयसी'च्या निवेदनात दिली आहे. ही कामगिरी आपल्या ग्राहकांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना महत्त्वाची आर्थिक सुरक्षा प्रदान करण्याच्या ध्येयाप्रती आपली खोल वचनबद्धता दर्शवते, असे 'एलआयसी'ने म्हटले आहे. त्यांनी प्रत्येक एजंटला २० जानेवारी २०२५ रोजी 'मॅड मिलियन डे' योजनेखाली किमान एक पॉलिसी पूर्ण करण्याचे आवाहन केले होते. 'एलआयसी'म्हणजे भारतीय जीवन विमा महामंडळ. जून १९५६ मध्ये भारतीय जीवन विमा कायदा मंजूर झाल्यानंतर सप्टेंबर १९५६ मध्ये ती कॉर्पोरेट फर्म झाली. जुलै १९५६ पासून 'एलआयसी' कायदा लागू झाला. त्यामुळे भारतातील खासगी विमा उद्योगाचे राष्ट्रीयीकरण होण्यास मदत झाली. १५४ जीवन विमा कंपन्या, १६ परदेशी कंपन्या आणि ७५ भविष्य निर्वाह कंपन्यांचे विलीनीकरण करून 'एलआयसी ऑफ इंडिया'ची स्थापना करण्यात आली. ही भारतातील सर्वात मोठ्या वित्तीय संस्थांपैकी एक आहे.

याच सुमारास भारताने अनेक संकटांवर मात करत जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था बनून दाखवले. अमेरिकेने भारताची आर्थिक कोंडी करण्याचा प्रयत्न केला, तरी भारतीय अर्थव्यवस्थेने अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे डोळे पांढरे केले. जपानला मागे सारत भारताने चौथ्या क्रमांकावर झेप घेतली. आता जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याकडे भारताची आगेकूच सुरू आहे. विशेष म्हणजे तिसरा टप्पा भारताच्या दृष्टिक्षेपात आला आहे. 'नीती आयोगा'चे 'सीईओ' बी. वी. आर. सुब्रमण्यम यांनी याबाबत माहिती देताना नीती आयोगाच्या दहाव्या 'गव्हर्निंग काऊंसिल'च्या बैठकीनंतर ही घोषणा केली. त्यांच्या मते भारतासाठी आता चांगली स्थिती असून देशाची आर्थिक स्थिती मजबूत आहे. भारताची अर्थव्यवस्था चार ट्रिलियन डॉलर इतकी झाली आहे. सुब्रमण्यम यांनी जागतिक नाणेनिधीच्या आकड्यांचा आधार घेत चौथी मोठी अर्थव्यवस्था होणे हा मैलाचा दगड असल्याची माहिती दिली.

जागतिक नाणेनिधीनुसार, भारताची अर्थव्यवस्था जपानपेक्षा मोठी झाली आहे. आता अमेरिका, चीन आणि जर्मनी हे भारताच्या पुढे आहेत. भारत नियोजनाप्रमाणे घौडदौड करत राहिला, तर येत्या अडीच–तीन वर्षांमध्ये जर्मनीला मागे टाकत तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल. सत्तेवर आल्यापासून ट्रम्प यांनी चीन आणि भारतासह युरोपच्या मुसक्या आवळण्याचा एकहाती कार्यक्रम सुरू केला आहे. चीन आणि भारतावर त्यांचा विशेष रोष दिसून येत आहे. 'मी म्हणेल तसे वागा, तरच कर आणि व्यापार सवलत मिळतील,' असा दम ते भरत आहेत. त्यांनी आता 'ॲपल कंपनी'ने 'आयफोन' भारतात नाही तर अमेरिकेतच तयार करावा, अशी भूमिका घेतली आहे. तसे न केल्यास २५ टक्क्यांपर्यंत टॅरिफ लावण्याची धमकी दिली आहे. असे असले तरी 'ॲपल'सह अनेक कंपन्या ट्रम्प यांना जुमानायला तयार नाहीत. त्याचे कारण भारतात वस्तू तयार करणे, उत्पादन तयार करणे स्वस्त आहे. मोठे उद्योग भारतात आले, वाढले तर अर्थव्यवस्थेला त्याची मदत होणार, हे इथे लक्षात घेतले पाहिजे.

आता एक वेगळी बातमी. वाढत्या राहणीमानाच्या खर्चामुळे आणि कर्मचाऱ्यांच्या बदलत्या आकांक्षांमुळे बहुतेक कर्मचारी दीर्घकालीन फायद्यांसाठी किंचित कमी पगार स्वीकारण्यास तयार आहेत. 'जीनियस कन्सल्टंट्स'या 'स्टाफिंग सोल्युशन्स' आणि एचआर सेवा प्रदात्या कंपनीच्या अहवालामध्ये हा निष्कर्ष काढण्यात आला आहे. या अहवालात म्हटले आहे की ७४ टक्के कर्मचारी दीर्घकालीन फायद्यांसाठी किंचित कमी पगार स्वीकारण्यास तयार आहेत. दीर्घकालीन फायद्यांमध्ये आरोग्य विमा, निवृत्ती नियोजन आणि शिक्षणासाठी पाठिंबा या मुद्द्यांचा समावेश आहे. 'जीनियस कन्सल्टंट्स'चा अहवाल देशभरातील विविध क्षेत्रांमधील ११३९ कर्मचाऱ्यांकडून मिळालेल्या अभिप्रायांवर आधारित आहे. त्यानुसार फक्त ३२ टक्के कर्मचाऱ्यांना मिळत असलेले लाभ पॅकेज आर्थिक कल्याणासाठी प्रभावीपणे मदत करते, असे वाटते. त्याच वेळी, ६१ टक्के कर्मचाऱ्यांनी त्यांना मिळणारे फायदे पुरेसे नाहीत, असे सांगितले. मुलाखत देणाऱ्या ५४ टक्क्यांहून अधिक कर्मचाऱ्यांच्या मते त्यांची कंपनी वेलनेस कार्यक्रम राबवताना मानसिक आणि आर्थिक आरोग्याला प्राधान्य देत नाही. अहवालात म्हटले आहे की, सुमारे ८४ टक्के कर्मचाऱ्यांचा विश्वास आहे की हायब्रीड किंवा रिमोट व्यवस्था (कोठूनही काम करण्याची सुविधा) त्यांना आपले आर्थिक व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करण्यास आणि बचत करण्यास मदत करेल. अहवालात म्हटले आहे की अभ्यासाच्या निष्कर्षांवरून दिसून येते की ते उत्पादकता वाढीपलीकडे कामाच्या ठिकाणी लवचिकता आणि आर्थिक कल्याणामध्ये एक मजबूत संबंध स्थापित करते. सुमारे ७३ टक्के कर्मचाऱ्यांचा विश्वास आहे की कामगिरीवर आधारित बोनस आणि प्रोत्साहनाने त्यांच्या सध्याच्या आर्थिक चिंता कमी होतील.

दरम्यान, भारतीय रिझर्व्ह बँकेने अलिकडेच केंद्र सरकारला २.६९ लाख कोटी रुपयांचा लाभांश दिला. यामुळे केंद्र सरकारला अपेक्षेपेक्षा जास्त लाभांश मिळाला. परिणामी, देशाच्या तिजोरीतील संपत्तीत चांगलीच वाढ होणार आहे. या लाभांशामुळे देशाला विकासकामांसाठी कोणाकडेही निधी मागण्याची गरज पडणार नाही. यासंदर्भातील निर्णय रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. केंद्र सरकारला मिळालेल्या लाभांशामध्ये मागील नऊ वर्षांमध्ये नऊपट वाढ झाली आहे. त्यामुळे भारताला अडचणीत आणण्याचा अमेरिका आणि पाकिस्तानचा मनसुबा अर्थहीन ठरला आहे. रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळाची ६१६ वी बैठक गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली झाली. रिझर्व्ह बँकेने आर्थिक वर्ष २०२४–२५ साठी केंद्र सरकारला २.६९ लाख कोटी रुपयांचा लाभांश दिला. मागील वर्षापेक्षा हे प्रमाण २७.४ टक्के जास्त आहे.

रिझर्व्ह बँकेने २०२३–२४ मध्ये केंद्र सरकारला २.१ लाख कोटी रुपये लाभांश दिला होता. त्यापूर्वी २०२२–२३ या आर्थिक वर्षात ८७,४१६ कोटी रुपये लाभांश दिला होता. रिझर्व्ह बँकेकडून विक्रमी लाभांश मिळाल्यानंतर अमेरिका आणि पाकिस्तानचा मनसुबा फोल ठरला. तज्ज्ञांच्या माहितीनुसार, पाकिस्तान भारताला युद्धाच्या संकटात टाकून देशाचे मोठे आर्थिक नुकसान करण्याच्या तयारीत होता. दुसरीकडे, अमेरिका टॅरिफ लावून भारताचे नुकसान करण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे भारताच्या विकासदराला धक्का बसण्याची शक्यता होती. यावेळी रिझर्व्ह बँकेकडून मिळालेल्या लाभांशामुळे अमेरिकेकडून लावण्यात आलेले टॅरिफ आणि पाकिस्तानविरोधात लढा देण्यासाठी संरक्षण क्षेत्र मजबूत करण्यास मदत मिळणार आहे. परिणामी, भारताचे नुकसान करण्याचा दोन्ही देशांचा प्लॅन फोल ठरला आहे. रिझर्व्ह बँकेकडून केंद्र सरकारला मिळणाऱ्या लाभांशात सातत्याने वाढ होत आहे. २०१७ मध्ये रिझर्व्ह बँकेने ३०,६५९ कोटी रुपयांचा लाभांश दिला होता. तो २०२५ मध्ये २.६९ लाख कोटी रुपये झाला. याचा अर्थ या लाभांशात गेल्या नऊ वर्षांमध्ये ८.७७ टक्के वाढ झाली आहे. आता पुढील काही वर्षांमध्ये लाभांश ३ ते ३.५ लाख कोटी रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

# श्री आदिशक्ती मुंबादेवी प्रवेशद्वाराची कहार समाजाची मागणी पूर्ण : आ. काळे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : कोपरगाव शहरात श्री आदिशक्ती मुंबादेवी प्रवेशद्वार व्हावे अशी कहार समाजाची मागील अनेक वर्षापासूनची मागणी होती. सर्व समाजाच्या नागरीकांना समाज मंदिर आणि सभागृहासाठी आवश्यक निधी दिला आहे.

त्याप्रमाणे मागील अनेक वर्षापासूनची कहार समाजाची मागणी व त्यांच्या धार्मिक भावनांची दखल घेवून स्थानिक विकास निधी अंतर्गत श्री आदिशक्ती मुंबादेवी प्रवेशद्वाराची मागणी पूर्ण केली असल्याचे आ. आशुतोष काळे यांनी म्हटले आहे.

कोपरगाव शहरात आमदार स्थानिक विकास निधीअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या श्री आदिशक्ती मुंबादेवी प्रवेशद्वाराचे भूमिपूजन रविवार (दि. १) रोजी आ. काळे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या प्रसंगी ते बोलत होते.




> श्री आदिशक्ती मुंबादेवी प्रवेशद्वारामुळे कोपरगाव शहराच्या वैभवात भर पडणार आहे. नागरीकांना अपेक्षित असलेले कोपरगाव मतदार संघाबरोबरच कोपरगाव शहरातील सर्व विकासकामे लवकरच पूर्ण होणार आहे.
>
> **– आशुतोष काळे,आमदार**

आ. काळे पुढे बोलताना म्हणाले की, कोपरगाव शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विविध पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचा माझा नेहमीच प्रयत्न राहिलेला आहे. कहार समाजाच्या मागणीस प्राधान्य देवून कोपरगाव शहरात उभारल्या जाणाऱ्या श्री मुंबादेवी प्रवेशद्वार कोपरगाव शहराच्या श्रद्धा व संस्कृतीचे प्रतीक ठरणार आहे.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी,माजी नगरसेवक, कार्यकर्ते, व्यापारी व कहार समाज बांधव व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ. जगतापांच्या हस्ते इलेक्ट्रॉनिक वाहनाचा शुभारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : येथील सावेडी मधील शिवम टीव्हीएसमध्ये आयक्यूबयूजी नवीन इलेक्ट्रॉनिक वाहनाचा लोकार्पण सोहळा आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी शिवम टीव्हीएसचे संचालक अप्पासाहेब होले, स्वप्नील होले, जनरल मॅनेजर आकाश शिंदे, मॅनेजर सेल्स योगेश जगदाळे, आय क्यूब मॅनेजर शकील शेख, किरण गरुड, खंडागळे,निलेश कडवा, बत्रा, जैन यांच्यासह आदी नागरिक उपस्थित होते.




टीव्हीएस आयक्यूबयूजी नवीन इलेक्ट्रॉनिक वाहन एका चार्जिंगमध्ये १४५ किमी जाते. तर ताशी ७८ किमी वेग आहे. याशिवाय अनेक सुविधा उपलब्ध आहेत. तर सध्या रुपये ७००० कॅश बँक ऑफर चालू आहे.

इच्छुकांनी शिवम टीव्हीएस दालनाला भेट देऊन गाडी पाहावी व सध्या असणाऱ्या ऑफरचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पान १ वरून | पान १ वरून | पान १ वरून

## जिल्हा गोळीबाराने हादरला

करून लाथाबुक्क्याने मारहाण करून जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने फिर्यादी व साक्षीदार यांच्यावर गोळीबार केला. यामध्ये साक्षीदाराच्या पायाला गोळी लागली असून त्यास अहिल्यानगर येथील खाजगी हॉस्पीटलमध्ये उपचारासाठी दाखल केले असून त्याची प्रकृती स्थिर आहे. घटना घडताच अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. प्रशांत खैरे, कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक यांनी घटनास्थळी भेट देऊन तीन पथके आरोपीच्या शोधार्थ पाठवले आहे. याबाबत जामखेड पोलीसात अदित्य बबन पोकळे (वय २०, धंदा वॉशिंग सेंटर, रा. पोकळेवस्ती, जामखेड) याने फिर्याद दिली की, रविवार, दि. १ रोजी रात्री दहा वाजता विंचरणा नदीजवळ घर आहे. तेथे पोकळे वस्तीवरील नागरीक व महिला होत्या. यावेळी एका चारचाकी वाहनातून तीन अज्ञात इसम उतरले व ते तेथे लघवी करू लागले. त्यांना येथे लघवी करू नका, महिला बसल्या आहेत. असे म्हणल्याचा राग आल्याने त्यांनी फिर्यादी आदीत्य पोकळे यास शिवीगाळ करून मारहाण केली. यावेळी तेथे कुणाल बंडु पवार (वय २०, रा. जामखेड) आला, तीन अज्ञातांनी त्यांच्याजवळील पिस्टलने या दोघांवर गोळीबार केला. पोलीस निरीक्षक महेश पाटील हे घटनेचा तपास करत असून लवकरच आरोपीस अटक करण्यात येईल, असे सांगितले.

## कोरड्या घोषणा नको, कर्जमाफी जाहीर करा

नुकसान झाले आहे. जनावरांच्या गोठ्याचे नुकसान झाले आहे. दुसरीकडे खरिपाची तयारी सुरु असतानाच हे संकट ओढवल्याने आता शेतकऱ्यांकडे पैसे नाहीत, शेतकरी मोडून पडला आहे. पण सरकारची मदत करण्याची मानसिकता दिसत नाही. एनडीआरएफच्या निकषाने मदत करायची की एसडीआरएफच्या निकषाने ह्यात शेतकऱ्याला काही देणेघेणे नाही, त्यांना भरीव मदत मिळाली पाहिजे. सरकारने ३ हेक्टरचा निकष बदलून २ हेक्टर केला, हे आणखी अन्यायकारक आहे. पीक विम्याचे निकष बदलल्याने त्यातूनही फारशी मदत मिळत नाही. सरकारने पंचनामे करण्याचे आदेश दिले. पण प्रत्यक्षात प्रशासन काम करताना दिसत नाही. पालकमंत्र्यांनी जिल्ह्याचा दौरा करून आढावा घेतला पाहिजे, पण तसे होतानाही दिसत नाही. केवळ कोरड्या घोषणा करण्याऐवजी सरकारने कर्जमाफी जाहीर केली पाहिजे, असे बाळासाहेब थोरात म्हणाले. या पत्रकार परिषदेला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष प्रशासन व संघटन गणेश पाटील, मुंबई काँग्रेसचे कार्याध्यक्ष व राष्ट्रीय प्रवक्ते चरणजित सिंह सप्रा, प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस रमेश शेट्टी, श्रीरंग बरगे आदी उपस्थित होते.

## महानगर बँकेत गितांजली शेळकेंची सरशी

३४२२, योगेश पाटील ३१७७, अर्जून राऊत ३१६८, सुमन शेळके, स्मिता शेळके ३६११, नंदकुमार तांबे ३२०८, बबुशा वरखडे ३३००, तर इतर मागास मधून मंगेश कुऱ्हे ३५००, महिला राखीव मधून सुमन शेळके ३८३२, स्मिता शेळके ३५४८, भटक्या जाती जमातीमधून प्रविण गजरे ३५८० मते मिळवत पराभूत झाले आहेत. महानगर बँकेच्या ६४ हजार सभासदांना मतदानाचा अधिकार असताना प्रत्यक्षात अवघे १६ हजार म्हणजे शेकडा २५ टक्के सभासदांनी मतदान केल्याने बँकेच्या इतिहासात सर्वात निच्चांकी मतदान झाले. तरी पण त्यातील शेकडा ८० टक्के मताधिक्य घेत गितांजली शेळके यांच्या नेतृत्वाखालील सॉलिसिटर गुलाबराव शेळके पॅनलने विजय साकार केला. बँकेत शेळके परिवाराच्या स्नुषा असलेल्या गितांजली शेळके यांचीच सत्ता आली. तर खऱ्या अर्थाने शेळके परिवाराचीच सत्ता बँकेत आली, असे म्हणाल्यास वावगे ठरणार नाही.

## बिबट्याचा पती–पत्नीवर हल्ला

घरात घुसून लक्ष्मीबाई आरोटे यांच्यावर हल्ला चढवून ठार मारण्याचे प्रयत्न केले. कुटुंबातील लोक व नातेवाईकांनी जखमींना ताबडतोब कोतूळ ग्रामीण रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले. त्यांच्यावर उपचार सूरू असून प्रकृती सुधारत आहे. आ. डॉ. किरण लहामटे यांनी कोतुळ ग्रामीण रुग्णालायात भेट देत रुग्णांची विचारपूस केली.

## 'वापरा आणि वाऱ्यावर सोडून द्या'

सरली. सरकारनेही त्यांना मंत्रीपदावरून दूर करून माणुसकी आणि संवेदनेचे धडे आधी द्यावेत. कृषि मंत्रीपदाच्या माध्यमातून जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यासाठी सेवा करण्याची संधी कार्यक्षम आणि संवेदनशील व्यक्तीकडे सोपवावी. यामुळे किमान शेतकऱ्याला न्याय तरी मिळेल, असे ते म्हणाले होते.

## टेम्पो–ट्रॅव्हलरचा अपघात

शौर्य संतोष पवार (वय ११), संस्कृती अनिल पिसाळ (वय १७), आदिती कुणाल पिसाळ (वय १८)यामध्ये वरमाला पवार, आरती मालोटकर, रुद्र पिसाळ आणि अनन्या म्हस्के या चौघांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना तात्काळ अहिल्यानगर येथे हलवण्यात आले आहे. उर्वरित जखमींवर पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात आले. या अपघातामुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन तपास सुरू केली आहे.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय– गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय– जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, ※ कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11

# रासायनिक खतांच्या मागणीत वाढ

## पिकांच्या उत्पादकतेवर विपरित परिणाम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : एकीकडे शासनाने पंजाबराव देशमुख सेंद्रिय शेतीची मोहीम हाती घेतली असतानाच यंदा रासायनिक खतांचीही मागणी वाढली आहे. तालुक्यात दरवर्षी रासायनिक खतांचा अमर्याद वापर लक्षात घेता ते शेतीला मारकच ठरणार आहे.

वारंवार रासायनिक खतांच्या माऱ्याने पिकांच्या उत्पादकतेवर विपरित परिणाम पहायला मिळतोय. त्याचे ऊस पीक हे उत्तम उदाहरण आहे. पुढच्या पिढीसाठी आपली जमीन जिवंत ठेवायची असेल तर, शेतकऱ्यांनी रासायनिक खतांच्या वापराबाबत गांभीयनि विचार करण्याची गरज व्यक्त होत आहे.



मुळात ऊस पिकाला हेक्टरी एक टनापर्यंत खतांची शिफारस आहे. परंतु प्रत्यक्ष दीडपट, तर कोणी दुपटीने वापर करीत आहे. म्हणूनच उसाच्या उत्पादन क्षमतेवर परिणाम झाला आहे. दरवर्षी उत्पादकता वाढवण्याच्या मानसिकतेमुळे रासायनिक खतांचा मारा केला जातो. हे चुकीचे असून भविष्यात त्याचे गंभीर परिणाम जाणवणार आहेत. त्यामुळेच शेतात बकरी बसवण्यासह शेणखत, गांडूळ, जीवाणु, हिरवळीची खते, जीवामृत, बीजामृत, निमार्क अशी सेंद्रिय खते वापरली पाहिजेत.

अमर्याद रासायनिक खत वापराने उत्पादन खर्चात वाढ माती परीक्षण न करता खतांच्या वापराने पिकासह जमिनीच्या आरोग्यावर परिणाम जमिनीत क्षाराचे प्रमाण वाढते, मित्र कीटकांची संख्या घटते. एकाच प्रकारच्या डोसने खतांचे जमिनीत स्थिरीकरण होते. पिकांच्या अवस्थेनुसार खतांचा वापर हवा; अन्यथा खते वाया अति पाण्याने खतांचा अंश जलस्रोतात जाऊन पाणी दूषित जमिनीतील उपयुक्त जीवाणू अकार्यक्षम होतात.

### जीवाणू खते का द्यायची ?

रासायनिक खते प्रक्रिया करून पिकांना उपलब्ध करून देण्याची महत्त्वाची भूमिका जीवाणूंची द्विदल पिकांना नत्राचा पुरवठा करताना रायझोबियम तर एकदल पिकांसाठी ॲझिटोबॅक्टर जीवाणूची गरज जमिनीतील स्थिर झालेले स्फुरद विरघळणारे जवाणू पिकांना फायदेशीर उपयुक्त जिवाणू असलेल्या जमिनीचे आरोग्य सुपीक असते. पिकांच्या वाढीसाठी विविध जीवाणु दिवसरात्र पिकांना अन्न उपलब्ध करतात.

# मुकेश झोडगे यांचे सभासदत्व कायम

**जनता आवाज वृत्तसेवा**



**आहिल्यानगर :** भिंगार अर्बन को-ऑप बँक लि. मुकेश झोडगे यांचे सभासदत्व कायम ठेवण्याचे आदेश अप्पर निबंध सहकारी संस्था पुणे यांनी काढला आहे.

भिंगार अर्बन को-ऑप बँक लि. भिंगार ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत नोंदविण्यात आलेली संस्था आहे. भिंगार अर्बन को-ऑप बँक लि, भिंगार या संस्थेने सभासद मुकेश रमेश झोडगे यांचे सभासदत्व रद्द करणेबाबतच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजुरी मिळणेबाबत दि. ०३/१०/२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर या कार्यालयात सादर केला होता. भिंगार अर्बन को-ऑप बँक लि, भिंगार या बँकेने सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर या कार्यालयाने बँकेचे कार्यक्षेत्र राज्य असुन सदर बँकेचे निबंधक हे कार्यालय असल्याने बँकेने सादर केलेला प्रस्ताव आवश्यक त्या कार्यवाहीसाठी या कार्यालयात सादर केला होता. ११५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेतही फेटाळण्यात आला होता. या नंतर मुकेश रमेश झोडगे यांनी सभेत गैरवर्तन केल्याने, सभेत उपस्थित सदस्यांनी त्यांचे सभासदत्व कायमचे रदद करुन, शेअसची रक्कम रिझर्व्ह फंड खाती वर्ग करण्यात यावी, अशा आशयाचा प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर या कार्यालयास पाठविण्यात आला होता.

अप्पर निबंधक, सहकारी संस्था (तपासणी व निवडणूका) महाराष्ट्र राज्य, पुणे प्राप्त झालेल्या अधिकासनुसार, भिंगार अर्बन को-ऑप बँक लि. भिंगार या बँकेच्या सर्वसाधारण सभेमधील बँकेचे सभासद मुकेश रमेश झोडगे यांचे सभासदत्व रद्द करण्यास संदर्भात ठेवलेला ठराव तरतुदीचे पालन न केल्याने अमान्य करण्यात येत आहे.

त्यामुळे भिंगार अर्बन को आप बँकेचे मुकेश रमेश झोडगे यांचे सभासत्व पद कायम राहत असल्याचा आदेश मिलिंद आखरे अप्पर निबंध सहकारी संस्था पुणे यांनी काढला आहे.

# बौध्द महासभेची तालुका कार्यकारिणी जाहीर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** भारतीय बौध्द महासभा अहिल्यानगर उत्तर विभागाची कोपरगाव तालुका कार्यकारिणी पुनर्गठण बैठक अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री गौरव पवार यांच्या आदेशानुसार व जिल्हाध्यक्ष शांताराम रणशूर व सरचिटणीस नरेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा संघटक व कोपरगाव प्रभारी बिपीन गायकवाड यांनी कोपरगाव तालुका पुनर्गठण बैठकीचे आयोजन नुकतेच साईबाबा कॉर्नर येथील महात्मा गांधी चारिटेबल ट्रस्ट प्रदर्शन हॉल या ठिकाणी केले होते.

यावेळी जिल्हा प्रचार व पर्यटन विभागाचे उपाध्यक्ष गौतम पगारे, संरक्षण विभागाचे उपाध्यक्ष आतिश त्रिभुवन, हिशोब तपासणी विजय जगताप, जिल्हा संघटक व कोपरगाव तालुका प्रभारी बिपिन गायकवाड, जिल्हा संघटक विश्वास जमधडे आदी जिल्हा कमिटीच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये प्रथम महामानवांच्या प्रतिमांचे पूजन करून त्रिशरण पंचशील घेऊन त्यानंतर मागील कार्यकारिणीचा कार्य अहवाल तालुकाध्यक्ष विश्वास जमधडे यांनी सादर केल्यानंतर सदरची कार्यकारिणी जिल्हाध्यक्ष शांताराम रणशूर यांनी ती बरखास्त करून शांताराम रणशूर यांच्या अध्यक्षतेखाली नवनिर्वाचित तालुका पदाधिकाऱ्यांची निवड प्रक्रिया संस्थेच्या बायोलॉज प्रमाणे लोकशाही पद्धतीने निवड प्रक्रिया घेण्यात आली.

### अशी आहे नवीन कार्यकारिणी

भातणकर (तालुका अध्यक्ष), सिद्धार्थ मेहेरखांब (सरचिटणीस), बाळासाहेब खाजेकर (कोषाध्यक्ष), सचिन खंडीझोड (उपाध्यक्ष संस्कार विभाग), अण्णासाहेब नवगिरे (उपाध्यक्ष प्रचार व पर्यटन), सागर त्रिभुवन (उपाध्यक्ष संरक्षण), अरुण लोंढे (हिशोब तपासणी), रामनाथ लक्ष्मण जाधव (सचिव संरक्षण), गणेश भागवत निळे (सचिव संरक्षण), अजय सदाशिव विघे (संघटक), विलास छगन गवळी (संघटक), सुनील संपत खंडवे (संघटक), महेंद्र विधाते (संघटक), किरण गायकवाड (संघटक) यांची निवड प्रक्रिया जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये घेण्यात आली.

# महानगरपालिका कर्मचारी पतसंस्थेची सभा उत्साहात

## पतसंस्थेला ६९ लाख रुपये नफा; ११ टक्के डिव्हिडंट वाटपाला मंजुरी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेची ११३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन विकास गीते यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. पतसंस्थेला चालू वर्षी ६९ लाख रुपये नफा झाला असून सभासदांना ११ टक्के डिव्हिडंट वाटपाला मंजुरी देण्यात आली. पतसंस्थेच्या संचालक मंडळांनी नेहमीच सभासदांच्या हिताचे निर्णय घेतले असल्यामुळे पतसंस्था यशाच्या शिखराकडे वाटचाल करीत असल्याचे प्रतिपादन चेअरमन विकास गीते यांनी केले.

अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या ११३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना चेअरमन विकास गीते समवेत व्हाईस चेअरमन उषाताई वैराळ, ज्येष्ठ संचालक बाबासाहेब मुदगल, तज्ञ संचालक जितेंद्र सारसर, संचालक सतीश ताठे, श्रीधर देशपांडे, बलराज गायकवाड, अजय कांबळे, बाळासाहेब पवार, विजय कोतकर, कैलास चावरे, सोमनाथ सोनवणे, गुलाब गाडे, किशोर कानडे, बाळासाहेब गंगेकर, संचलिक प्रमिलाताई पवार, कार्यलक्ष्मी संचालक आनंद तिवारी, संतोष गवळी आदी सभासद कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.ज्येष्ठ संचालक बाबासाहेब मुदगल म्हणाले की, पतसंस्थेने नेहमीच सभासदांच्या अडी-अडचणीच्या काळात नेहमी उभे राहण्याचे काम केले आहे. सभासदांच्या मुला-मुलींचे शिक्षण, लग्न समारंभ यासाठी आर्थिक कर्जरूपी मदत केली आहे. तसेच सभासदाच्या आजारपणाचे तातडीने निदान व्हावे, यासाठी २५ हजार रुपयाची आर्थिक मदत केली जाते. यावर्षी १ लाख २५ हजार रुपयाची मदत झाली आहे. तसेच ९ मयत सभासदांचे कर्ज निवारण निधीतून कर्जरूपी ८ लाख ८ हजार २०० रुपये माफ केले आहे. याचबरोबर सभासद निर्वाण निधीतून १० मयत सभासदांच्या वारसांना प्रत्येकी १० हजार रुपयाची आर्थिक मदत केली आहे, असे ते म्हणाले.कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी म्हणाले की, सभासदांना तातडीचे कर्ज ३० हजार रुपया वरून ४० हजार करण्यात आले आहे. जिल्हा बँकेचे पतसंस्थेवर कॅश क्रेडिट कर्ज १७ कोटी रुपये होते, ते फेडून आपली पतसंस्था स्व- भांडवली झाली आहे. यावेळी विषय पत्रिकेचे वाचन केले असून सभासदांनी सर्व विषयांना मंजुरी दिली असल्याचे ते म्हणाले.

# खत कंपन्यांकडून युरिया देण्यास टाळाटाळ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये गेल्या दोन महिन्यांपासून युरीया खताचा प्रचंड तुटवडा भासत आहे. आज रोजी जिल्ह्यामध्ये ऊस पिकांचे क्षेत्र वाढले असून मे मध्ये झालेल्या पावसामुळे ऊस पिकाच्या वेळेवर मशागत करण्यासाठी खतांची प्रचंड गरज असून युरीया नसल्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे इतर शेतकरीही खताचा रॅक लागण्याची प्रचंड वाट बघत आहे. याबाबत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी व फर्टीलायझर असोसिएशन यांच्याकडे सखोल चौकशी केली असता लिंकिंग (पुरवणी खते) शासनाने व व्यापाऱ्यांनी बंद केल्यामुळे खत कंपन्यांकडून युरिया पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविली जात आहे. श्रीरामपूर तालुक्यामध्ये जवळपास ५०० टन बफर स्टॉक युरियाचा असूनही शेतकऱ्यांना तो उपलब्ध होत नाही व खत कंपन्यांकडून नवीन पुरवठा होत नाही. डीपी सारख्या संयुक्त खतांना मोठ्या प्रमाणात केंद्र सरकारकडून अनुदान उपलब्ध असताना खत कंपन्यांकडून गेले एक वर्षापासून डीपी खाताची मागणी असूनही पुरवठा झालेला नाही. तरी शासनाने शेतकऱ्यांना युरिया व डीएपी खतांचा पुरवठा करावा, अशी मागणी अहिल्यानगर जिल्हा शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे. युवराज जगताप, हरिभाऊ तूवर, शिवाजी जवरे, बच्चु मोडवे, अशोक काळे, नरेंद्र काळे, डॉ. दादासाहेब आदिक, सुदामराव औताडे, साहेबराव चोरमल, डॉ. विकास नवले, ॲड. प्रशांत कापसे, अँड सर्जेराव घोडे, डॉ. रोहित कुलकर्णी, सतीश नाईक, सागर गिऱ्हे, संतोष पटारे, सुजित बोडखे, शरद आसने, ईश्वर दरंदले, बाबासाहेब वेताळ, बाबासाहेब नागवडे, अशोक नागोडे, राहुरी तालुका प्रमुख नारायण टेकाळे, अशोक टेकाळे, अमोल मोढे, इंद्रभान चोरमळ, कडू पवार, अहमद भाई इनामदार, अकबर शेख आदींनी खतांचा पुरवठा होणेबाबत मागणी केली आहे.

# विंग कमांडर नलगे यांचा सत्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार :** शिवसेना महिला आघाडी उत्तर आहिल्या नगर प्रमुख सुनिता शेळके यांनी ऑपरेशन सिंदूर मध्ये प्रत्यक्ष सहभागी होऊन शौर्य गाजवणाऱ्या भारतीय वायुसेनेचे विंग कामांडर विवेकानंद नलगे व त्यांचे कुटुंबीय यांचा चिंचोली येथे त्यांच्या राहत्या घरी जाऊन यथोचित सन्मान केला.



श्री विवेकानंद नलगे हे भारत मातेचे सुपुत्र असून ऑपरेशन सिंदूरच्या दरम्यान स्वतःच्या प्राणाची बाजी लावून त्यांनी शत्रूला प्रत्येक आघाडीवर निष्प्रभ केले. त्यांनी केलेल्या कामगिरीचा निश्चितच प्रत्येक भारतीयाला तसेच आम्हाला अभिमान आहे आणि त्यामुळेच आम्ही शिवसेना पक्ष त्याचबरोबर महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री शिवसेनाप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या वतीने शुभेच्छा देऊन त्यांचा गौरव केला असल्याचे यावेळी माध्यमांशी बोलताना सुनीता शेळके म्हणाल्या. यावेळी त्यांच्यासोबत गलांडे कन्स्ट्रक्शनचे राजेंद्र गलांडे, गौरव गलांडे बन्सी भोसले तसेच शिवसेनेचे अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# महादेव मंदिरासाठी ४१ हजारांची देणगी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर :** भारतीय जनता पक्ष,अहिल्यानगर व्यापारी आघाडीच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर त्रिजन्म शताब्दी निमित्त अहिल्यादेवींनी मंदिरांचे केलेले जीर्णोद्धार या प्रेरणादायी कार्याला अनुसरून सर्जेपुरा येथील प्राचीन पंचमुखी महादेव मंदिर जीर्णोद्धाराकरीता ४१ हजार रुपयाची देणगी शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांचा हस्ते देण्यात आली. यावेळी व्यापारी आघाडी अध्यक्ष महेश गुगळे, नीरज राठोड, हर्षल बोरा, सुरेश लालबागे, गोपाळ वर्मा, प्रशांत मुथ्था, रूपेश वर्मा, प्रशांत बुऱ्हाडे, लक्ष्मीकांत तिवारी, सचिन पारखी, प्रशांत मुथा, पंडित वाघमारे, वैभव लांडगे, मयूर बोचूघोळ, प्रिया जाणवे, रेणुका करंदीकर, प्रिया जानवे, कालिंदी केसकर, सविता कोटा, श्वेता झोड, सचिन पळशीकर आदी दिसत आहे.


# पारनेरमध्ये कांद्याला १७०० रुपयांचा भाव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** येथील बाजार समितीत कांद्याचे लिलाव झाले. एक नंबर कांद्याला १७०० रुपयांचा भाव मिळाला. पारनेर तालुक्यासह शेजारील तालुक्यातून कांद्याच्या २३९४२ कांदा गोण्यांची आवक झाली.

कांद्याचे प्रतवारीनुसार प्रतिक्विंटलचे भाव :

एक नंबर कांदा : १६२५ ते १७००, दोन नंबर कांदा : १५०० ते १६००, तीन नंबर कांदा : १२०० ते १४००, चार नंबर : १०० ते ७००, गोल्टी कांदा : ९०० ते १२००. अवकाळी पावसामुळे कांद्याचे मोठे नुकसान झालेले आहे. सध्या कांद्याला चांगला भाव मिळत आहे. अवकाळी पावसात भिजलेला कांदा आता शेतकरी बाजारात आणू लागले आहे. त्यामुळे कांद्याच्या भावातघसरण होत आहे. चांगल्या कांद्याला मात्र चांगला मिळत आहे.



किरकोळ बाजारात कांद्याला २५ ते ३५ रुपये किलो दरम्यान बाजारभाव मिळत आहे. आगामी काळात कांद्याचे भाव आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# संजीवनीच्या १५ विद्यार्थ्यांना नोकऱ्या

## सॅप कोर्समुळे शेकडो विद्यार्थ्यांना फायदा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजने सॅप (सिस्टिम ॲप्लिकेशनस् अँड प्रॉडक्ट्स) या सॉफ्टवेअर कंपनीशी सामंजस्य करार (एमओयु) केलेला आहे. त्यामुळे या कोर्सचे प्रशिक्षण एका स्वतंत्र विभागामार्फत विद्यार्थ्यांना दिल्या जाते. तसेच संस्थेच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट (टीअँडपी) विभाग आपल्या विद्यार्थ्यांना विविध कंपन्यांमध्ये नोकरी मिळण्यासाठी संपर्क करतो. अशाच सॅप विभाग व टीअँडपी विभागाच्या संयुक्तिक प्रयत्नातून झेन्सर टेक्नॉलॉजिज या कंपनीचे कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले होते. यात कंपनीने अंतिम वर्षातील १५ विद्यार्थ्यांची चांगल्या वार्षिक पॅकेजवर नोकरीसाठी निवड केली आहे, अशी माहिती संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजने प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.



झेन्सर टेक्नॉलॉजिज ही एक डिजिटल सोल्युशन्स आणि टेक्नॉलॉजी सर्विसेस कंपनी आहे. या कंपनीचे मुख्यालय पुणे येथे असुन तिचे अस्तित्व जगभर आहे. या कंपनीने नोकरीसाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांमध्ये कॉम्पयुटर इंजिनिअरींगच्या राजवर्धन विलास जाधव, सिध्दांत सुधाकर नवथर, श्रीजित पोपट पानगव्हाणे, वेदांत निवृत्ती गोर्डे, गौरी बाबासाहेब चांदर, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीच्या रोहित दत्तात्रय बुळे, शंतनू गोरक्षनाथ ढोकळे, वैभव परशराम वेताळ, इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या शुभांगी प्रमोद आहेर, अथर्वराज सुभाष चोरमुंगे, हर्षद अतुल देसाई, इलेक्ट्रिकल इंजिनिअरींगची स्नेहा बाळासाहेब शेळके, मेकॅट्रॉनिक्स इंजिनिअरींगच्या ऋतिका आण्णासाहेब जाधव, आकांक्षा अरूण कार्ले व शुभम आण्णासाहेब देवगिरे यांचा समावेश आहे.संजीवनीचे अध्यक्ष श्री नितिनदादा कोल्हे यांनी सर्व निवड झालेले विद्यार्थी व त्यांच्या पालकांचे अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मॅनेजिंग ट्रस्टी अमित केल्हे यांनी सर्व विद्यार्थ्यांचा छोटेखानी कार्यक्रमात सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

> शासनाने मुलींसाठी शिक्षण शुल्कात पुर्ण माफी दिली आहे. मलाही शेवटच्या वर्षात या योजनेचा फायदा झाला. म्हणून पालकांना विनंती करेल की, सरकारच्या योजनेचा फायदा घेत आपल्या मुलींना व्यावसायिक शिक्षण देवुन स्वावलंबी करा. मुली व स्त्रीयांना आज समाजातील अनेक वाईट चालीरितीनुसार अन्याय सहन करावा लागतो. म्हणून त्यांचे जीवन स्वावलंबी बनवा.
> **- गौरी चांदर**

# अकरावीच्या प्रवेशासाठी मदत केंद्र सुरू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई :** महाराष्ट्र शासनाने अकरावीचे प्रवेश ऑनलाईन पद्धतीने करावयाचे ठरवले असल्याने प्रवेश पत्र भरत असताना विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यात प्रामुख्याने ऑनलाइन प्रवेश अर्ज कसा भरावा? त्यासोबत कोणकोणती कागदपत्रे जोडावी? विषय कसे निवडावे? विद्यालयाचा प्राधान्यक्रम कसा द्यावा? असे अनेक प्रश्न विद्यार्थ्यांना पडत आहे.

या सर्व अडचणी विद्यार्थ्यांना येऊ नये म्हणून सोनई येथील सुजाता इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, सोनई यांनी ऑनलाइन मदत केंद्र सुरू केले आहे. तरी अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी संपर्क साधण्याचे विद्यालयाच्या प्राचार्य ज्योती सोनवणे यांनी सांगितले आहे. सोबत येताना विद्यार्थ्यांनी शाळा सोडल्याचा दाखला, दहावी गुणपत्रक, आधार कार्ड व फोटो घेऊन यावे. विद्यालयामध्ये आयटी सायन्स, कॉम्प्युटर सायन्स, प्लेन सायन्स हे विषय उपलब्ध आहे. तरी या सर्व सुविधांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन शाळा व्यवस्थापनाने केले आहे.

# आहिल्यादेवी होळकर ह्या देशातील आदर्श राज्यकर्त्या

## माजी मंत्री बाळासाहेब थोरात; संगमनेरमध्ये ३०० वी जयंतीनिमित्त अहिल्यादेवींना अभिवादन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : अहिल्यानगर जिल्ह्याची सुकन्या असलेल्या अहिल्यादेवी होळकर यांचे देशाच्या सामाजिक, धार्मिक आणि राजकीय क्षेत्रात मोठे योगदान असून सर्व जाती धर्माच्या जनतेला सोबत घेऊन पाण्याचे महत्त्व ओळखून जल व्यवस्थापनामध्ये मोठी क्रांती घडवणाऱ्या अहिल्यादेवी होळकर या देशातील आदर्श राज्यकर्त्या होत्या, असे गौरवोद्गार काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी काढले आहे.

> अहिल्यादेवी होळकर यांनी संगमनेरमध्ये ही अनेक मंदिरे आणि बारवी निर्माण केली याच प्रमाणे संगमनेरचे प्रसिद्ध कवी अनंत फंदी यांना त्यांनी राजाश्रय दिला. त्यांच्या समतेचा विचार पुढे नेण्यासाठी ३०० व्या जयंतीनिमित्त व विविध महापुरुषांच्या जयंती निमित्ताने वर्षभरात विविध वैचारिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे.
>
> **– बाळासाहेब थोरात, माजी मंत्री**

संगमनेरमध्ये आशीर्वाद पतसंस्थेसमोर ३०० वी जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर बाबासाहेब ओहोळ, शंकरराव खेमनर, रणजितसिंह देशमुख, विश्वासराव मुर्तडक, रामहरी कातोरे, अर्चना बालवडे, राम दास धुळगंड, भास्कर शर्माळे, अण्णा राहिंज, इंद्रजीत खेमनर, तुकाराम दातीर, सचिन खेमनर, ॲड. अशोक हजारे, माधव खेमनर, गोविंद खेमनर, ज्ञानेश्वर ढोले, राहुल खेमनर, चांगदेव खेमनर, हौशीराम वाघमोडे, अनिल कांदळकर, अविनाश शिंदे, सुभाष हळनोर, एस. एम. खेमनर, भास्कर खेमनर, अण्णासाहेब कुदनर, दीपक धुळगंड, ज्ञानेश्वर ढोणे, सचिन राहींज, राहुल खेमनर आदी उपस्थित होते.

माजी मंत्री थोरात म्हणाले की, देशाच्या राजकारणात राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी निर्माण केलेल्या इतिहासाचे अवलोकन करावे इतका अभिमानास्पद हा इतिहास आहे. भारतामध्ये ज्या महिला राज्यकर्त्या होऊन गेल्या त्यामध्ये आदर्श राज्यकर्त्या म्हणून पुण्यश्लोक आहिल्यादेवी यांचा गौरव होतो.

अत्यंत लोकाभिमुख कारभार करताना महिला सक्षमीकरणासाठी सती पद्धत बंद केली याचबरोबर महिलांना लष्करी शिक्षण दिले घोंगडीवर बसून कारभार करणाऱ्या अहिल्यादेवी यांनी २८ वर्षे यशस्वीपणे राज्यकारभार सांभाळताना आदर्श पद्धतीने निर्माण केली.

तर शंकर पाटील खेमनर म्हणाले की राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी



समानतेचा मंत्र दिला याच विचारांवर लोकनेते बाळासाहेब थोरात काम करत असून सर्व धर्म समभाव व मानवतेचा विचार त्यांनी कायम जोपासला असल्याचे ते म्हणाले.

याप्रसंगी अविनाश शिंदे, प्रा. गणेश गुंजाळ, अण्णासाहेब जगनर, प्राचार्य केजी खेमनर, रामदास खेमनर, शेखर सोसे, दिनकर भगत, सुभाष खेमनर, बाळासाहेब गेटे, रुपेश धुळगंड, दादाभाऊ खेमनर यांसह विविध पदाधिकारी उपस्थित होते

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. शंकरराव खेमनर यांनी केले. सूत्रसंचालन ॲड. अशोक हजारे व नामदेव कहांडळ यांनी केले. तर अण्णासाहेब राहिंज यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी कार्यकर्ते पदाधिकारी महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागरिकांचे हित पाहणारे अधिकारी दुर्मिळ झाले : गुंड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : शासकीय सेवेमध्ये अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने काम करून गोरगरीब नागरिकांचे हित पाहणारे अधिकारी आता दुर्मिळ झाले आहेत, असे प्रतिपादन माजी जिल्हा परिषद अध्यक्ष मंजुषा गुंड यांनी कर्जत येथे बोलताना प्रतिपादन केले.

आदर्श ग्रामसेवक पुरस्कार विजेते, ग्रामसेवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष व तब्बल ग्रामपंचायत विभागात चार दशके प्रामाणिक सेवा बजावलेल्या ग्रामपंचायत अधिकारी चंद्रकांत तापकीर यांचा सेवापूर्ती सोहळा कर्जत येथील महालक्ष्मी हॉटेलमध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

> गावामध्ये काम करताना ग्रामसेवक हा अतिशय महत्त्वाचा दुवा आहे. पदाधिकारी, गावामध्ये असणारी गटबाजी आणि सर्व सम ान्य जनतेचे हित ही सर्व तारेवरची कसरत करत ग्रामसेवक यांना गावाचा विकास करावा याचा असतो. कर्जत, श्रीगोंदा यासह विविध तालुक्यांमध्ये काम करताना आपल्या शिस्तप्रिय कामाचा ठसा सर्वत्र उमटवला.
>
> **– मंजुषा गुंड, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा मंजुषा गुंड होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा बँकेचे संचालक व बाजार समितीचे सभापती काकासाहेब तापकीर, जिल्हा बँकेचे दुसरे संचालक अंबादास पिसाळ, माजी नगराध्यक्षा उषा राऊत, अशोक खेडकर, सुनील शेलार, सचिन घुले पाटील, अमृत काळदाते, हर्षदा काळदाते, प्राथमिक शिक्षक बँकेचे अध्यक्ष बाळासाहेब तापकीर, उपसरपंच दरेकर, गटविकास अधिकारी रूपचंद जगताप यांच्यासह अनेक मान्यवर मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर चंद्रकांत तापकीर यांचा सन्मान करण्यात आला.



त्यांना स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छ, शाल-श्रीफळ व मानपत्र देऊन गौरविण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून त्यांच्या कार्यकाळातील योगदानाचा गौरव केला.

यावेळी काकासाहेब तापकीर, अंबादास पिसाळ, अशोक खेडकर, गटविकास अधिकारी रूपचंद जगताप, सचिन घुले, सुनील शेलार, पशुधन अधिकारी गांगर्डे, शिक्षक बँकेचे माजी अध्यक्ष सुद्रिक यांच्यासह अनेकांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजेंद्र यादव व रोहिणी गजेंद्र यादव यांनी केले.

# संगीता घोडेकर होळकर पुरस्काराने सन्मानित

## आ. विक्रम पाचपुते, माजी मंत्री पाचपुते यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदे** : तालुक्यातील पारगाव येथील सामाजिक कार्यकर्त्या संगीता बजरंग घोडेकर यांना पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार ग्रामपंचायतच्यावतीने सरपंच व उपसरपंच यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

श्रीगोंदे तालुक्यातील पारगाव सुद्रिक येथील संगीता घोडेकर या अनेक वर्षापासून सामाजिक कार्य करत आहेत. त्यांनी पंचायत समितीच्या अंतर्गत २२ महिला बचत गटाचे काम करत आहेत. त्या स्वतः यशोगाथा ग्राम संघ महिला अध्यक्ष आहेत.



तसेच शासनाच्या विविध योजना महिलांपर्यंत पोचविण्याचे काम करत आहेत.

तसेच विविध शासनाच्या योजना महिलांनापर्यंत पोहोचवल्या तसेच महिला सक्षमीकरण, आयुष्मान भारत गोल्डन कार्ड कॅम्प घेतला. मिटिंग घेतल्या, आशा अनेक उलखनीय कामगिरीबद्दल महिला व बालकल्याण विभागाच्या ग्राम पंचायतच्यावतीने सरपंच सुरेखा हिरवे व उपसरपंच सारिका दानवे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

घोडेकर यांचे अभिनंदन आ. विक्रम पाचपुते, माजी मंत्री बबनराव पाचपुते, डॉ. प्रतिभा पाचपुते, मीरा शिंदे, मीरा खेडके, नगराध्यक्ष शुभांगी पोटे, रूपाली पाचपुते, राजश्री शिंदे, जिल्हा सरचिणीस शुभांगी सप्रे, तालुकाध्यक्ष देवयानी शिंदे व भारती इंगवले यांनी केले. यावेळी सर्व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

# चक्क कर्मचाऱ्यांच्या जेवणाचा एसपींनी लुटला आनंद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त चौंडी बंदोबस्त करीत असताना एका झाडाखाली जेवायला बसलेले अंमलदार यांना पाहून जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी आवर्जून अंमलदार यांच्या डब्यातली पोळी भाजी जेवणाचा आनंद घेतला. या कृतीमुळे पोलीस अधीक्षकांना आपल्या पोलीस कर्मचाऱ्यांबद्दल आपुलकी दिसून येत आहे.

सोमनाथ घार्गे हे सध्या अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी यापूर्वी रायगड जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक म्हणूनही काम पाहिले आहे, तसेच श्रीराम पूर येथे ते पोलिस उपअधीक्षक म्हणून देखील होते.



राज्यात नांगऱ्या टोळीचा पर्दाफाश त्यांनी राज्यभरात सराफी पेढीवर दोरडे घालणाऱ्या कुख्यात नांगऱ्या टोळीचा छडा लावला होता.

### कर्मचाऱ्यांची ओळख परेड

अहिल्यानगरात दाखल झाल्यावर त्यांनी कर्मचाऱ्यांची ओळख परेड घेऊन आपल्या कामाची सुरुवात केली आपल्या कर्मचाऱ्यांबद्दल किती आपुलकी आहे. हेच पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी चौंडी येथे पोलीस कर्मचारी यांच्या डब्यातील पोळी भाजी घेत जेवण करीत आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे.

### लोकाभिमुख पोलीस प्रशासन

रायगडमध्ये असताना त्यांनी पोलीस प्रशासनाला लोकाभिमुख बनवण्यासाठी प्रयत्न केले, आणि शिस्तप्रिय आणि मितभाशी अधिकारी म्हणून ओळखले जात होते.

# काकडेंकडूनच शेतकऱ्यांना ताजनापूर लिफ्टचे पाणी

## चंद्रकांत महाराज झिरपे; कोळगाव येथे जनशक्ती विकास आघाडीच्या नूतन शाखेचा शुभारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : हातात कोणती मोठी सत्ता नसताना फक्त संघर्षातून ५०० कोटींच्या ताजनापूर लिफ्ट योजनेचे पाणी जनशक्ती विकास आघाडीचे संस्थापक अध्यक्ष ॲड. शिवाजीराव काकडे व हर्षदा काकडे यांनी २० गावांतील शेतकऱ्यांना दिले. त्यामुळे त्याचे श्रेय फक्त आणि फक्त काकडे यांनाच जाते. ताजनापूर लिफ्ट योजनेचे यशाचे कुंकू फक्त काकडेच्याच नावाचे आहे, ते इतरांनी लावू नये, असे प्रतिपादन ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक चंद्रकांत महाराज झिरपे यांनी केले.

> आज पक्षात जाणारे व असणारे सर्वच शांत आहेत. त्यांना पक्षाला विचारल्याशिवाय जनतेच्या प्रश्नावर बोलता येत नाही हे दुर्दैवी आहे. म्हणूनच सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नावर सतत झटणाऱ्या जनशक्तीमध्ये सुज्ञ युवक नागरिकांनी समावेश करावा.
>
> **– चंद्रकांत महाराज झिरपे**

दि.३१ मे रोजी कोळगाव येथे जनशक्ती विकास आघाडीच्या नूतन शाखेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

शाखेच्या अध्यक्षपदी आदिनाथ झिरपे, उपाध्यक्ष आकाश झिरपे, सचिव लक्ष्मण झिरपे तर कार्याध्यक्ष म्हणून लक्ष्मण झिरपे व विठ्ठल झिरपे यांची निवड करण्यात आली. तर विक्रम झिरपे, मनोज झिरपे, लहुजी झिरपे, प्रदीप झिरपे, संजय झिरपे यांची सदस्य म्हणून जनशक्तीचे कार्याध्यक्ष राम पोटफोडे यांच्या मार्गदर्शकाखाली निवड करून सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी चंद्रकांत महाराज झिरपे हे होते तर कार्यक्रमास सरपंच प्रभाकर झिरपे, बाळासाहेब झिरपे, अकबर शेख, राजेंद्र फलके, सुभाष झिरपे, डॉ. झिरपे,



अंबादास झिरपे, विष्णू झिरपे, ज्ञानेश्वर कोरडे, भीमराज झिरपे, सुखदेव झिरपे, पांडुरंग झिरपे, प्रदीप झिरपे आदी उपस्थित होते.

चंद्रकांत महाराज झिरपे म्हणाले की, काकडे दाम्पत्य हे सात्विक दाम्पत्य आहे. त्यांना समाजकारणाची आवड आहे. गोरगरिबांच्या प्रश्नाशी हे दांपत्य सतत झटत असते. पक्षात जाऊन गप्प बसण्याऐवजी ते जनशक्ती विकास आघाडीचे संघटन वाढवून गोरगरिबांचे प्रश्न सोडवत आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विक्रम झिरपे यांनी केले. तर आभार आदिनाथ झिरपे यांनी मानले.

# ग्रामीण विद्यार्थ्यांना मिळाले पावणे सहा लाखांचे पॅकेज

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : लोकनेते पद्मभुषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या एन.बी.ए. मानांकीत इन्स्ट्रुमेंटेशन अँड कंट्रोल विभागाच्या शेवटच्या वर्षात शिकत असलेल्या दोन विद्यार्थ्यांची इमर्सन एक्सपोर्ट इंजिनीअरिंग सेंटर, नाशिक या नामंकित कंपनीने कॅम्पस इंटरव्ह्यू आयोजित करून ५.७६ लाखांपर्यंत पगाराच्या नोकऱ्या उपलब्ध करून दिल्याने म हाविद्यालयाचे परिसरातून कौतुक होत आहे, अशी माहीती प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने यांनी दिली.

### दिग्गज मान्यवरांनी दिल्या शुभेच्छा

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पा., माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, सहसचिव भारत घोगरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने, सर्व विभाग प्रमुख, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थांनी अभिनंदन केले.

यामध्ये श्रध्दा ढाकणे आणि मयूर चौधरी या विद्यार्थ्यांची इमर्सन एक्सपोर्ट इंजिनीअरिंग सेंटर, नाशिक या कंपनीमध्ये निवड झाली असे इन्स्ट्रुमेंटेशन अँड कंट्रोल इंजिनिअरिंग विभागाचे विभाग प्रमुख डॉ. चंद्रकांत कडू यांनी सांगितले. यामध्ये सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट, ॲप्टीट्युड टेस्ट, सॉफ्टवेअर व स्कील डेव्हलपमेंट कोर्सेस, एंटरप्रीन्यूअरशिप इंटरनॅशनल प्रोग्रॅम, करियर गायडन्स, सराव मुलाखत इत्यादी उपक्रमांचा अंतर्भाव आहे. विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंट होण्यासाठी इन्स्ट्रुमेंटेशन आणि नियंत्रण अभियांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. चंद्रकांत कडू, डॉ. प्रताप विखे, डॉ. अण्णासाहेब वराडे आणि प्लेसमेंट समन्वयक प्रा. वर्षा भोसले तसेच सर्व स्टाफ मेंबर्स यांनी परिश्रम घेतले.

# वांगी खुर्द येथे होळकर जयंती उत्साहात

### आ. हेमंत ओगले, करण ससाणेंसह मान्यवरांची हजेरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : दि. ३१ मे २०२५ रोजी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त वांगी खुर्दमध्ये प्रथमच किर्तन सेवा आयोजित करण्यात आली. हभप शरद महाराज ढवळे यांनी कीर्तनसेवेच्या माध्यमातून अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन कार्य तसेच त्यांचे बारा ज्योतिर्लिंगाच्या जीर्णोद्धार व पुनर्स्थापना करण्यासाठी त्यांचे योगदान कायम स्मरणात राहील, असे सांगितले.

तसेच पुण्यश्लोक राजमाता



अहिल्यादेवी होळकर सामाजिक प्रतिष्ठान वांगी खुर्द व वांगी बुद्रुक तसेच ग्रामस्थानी जयंतीनिमित्त डीजेला फाटा देत नाविन्यपूर्ण प्रयोग करत कीर्तनाच्या माध्यमातून युवकांना प्रबोधनातून योग्य दिशा दाखवण्याचे काम केले असून इतर गावातील महापुरुषांच्या जयंतीनिमित्त असेच दिशादर्शक कार्यक्रम घ्यावेत, असे सर्वांना संबोधित केले.

या कार्यक्रमासाठी आ. हेमंत ओगले, जिल्हा बँकेचे संचालक करण ससाणे, जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, सचिन गुजर, डॉ. वंदना मुरकुटे, सोपानराव राऊत, योगेश विटनोर, सरपंच योगेश देवकर, प्रताप कवडे, सोपानराव गायकवाड, सरपंच संगीता कांबळे, चेअरमन बाबासाहेब गायकवाड, दिनकर गायकवाड, काकासाहेब साळे, डॉ. येळे, सोमनाथ पवार, गंगाधर पवार, आप्पासाहेब जगताप, डॉ. अनिल कोपनर, डॉ. पारखे, डॉ. रोहकले, दत्तात्रय देवकर, दत्तात्रय देवकर, अशोक मेकडे यासह आदी उपस्थित होते. किर्तनसेवा संपल्यानंतर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठान तसेच ग्रामस्थांनी महाप्रसादाचे आयोजन केले. या कार्यक्रमासाठी गणेश भजनी मंडळ, वांगी खुर्द, वांगी बुद्रुक यांचे सहकार्य लाभले.

# अहिल्यादेवी होळकर स्मारकासाठी निधी देणार

## आ. अमोल खताळ; संगमनेरात आ. खताळ यांनी अहिल्याबाई होळकरांना केले अभिवादन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : संगमनेर तालुक्यात अहिल्याबाई होळकर यांचे स्मारक भरण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. योग्य जागा उपलब्ध झाल्यास स्मारक उभारण्यासाठी शासन स्तरावरून भरीव निधी उपलब्ध करून देऊ, अशी माहिती आ. अमोल खताळ यांनी दिली.

> भारतात सर्वाधिक मंदिरे बांधण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त केंद्र व राज्य सरकार मार्फत विविध सामाजिक उपक्रम सुरू करण्यात आले आहेत.
>
> **– अमोल खताळ, आमदार**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त संगमनेर बसस्थानक परिसरात महायुतीच्या वतीने अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन करण्यात आले.

आ. खताळ म्हणाले की, गेल्या सहा महिन्यापूर्वी संगमनेर तालुक्यातील जनतेने ऐतिहासिक परिवर्तन घडवले आहे. आपण आमदार झाल्यापासून सर्वच महापुरुषांच्या जयंत्या उत्साहात साजऱ्या करत आहोत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या आदर्श महिला प्रशासक होत्या. मुघलांनी नष्ट केलेली मंदिरे पुन्हा उभारण्याचे कार्य त्यांनी केले. प्रारंभी आ. खताळ यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यासह छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ.



बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यांनी सर्वांना जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या .यावेळी महायुतीचे गुलाब भोसले, संदिप देशमुख पायल ताजने, रविंद्र दातीर, कैलास कासार, ॲड संदिप जगनर, मंजबापू साळवे ,मच्छिंद्र शेरम ाळे, शिवाजी शेरमाळे, कोंडाजी कडनर सुधाकर गुंजाळ, अशिष कानवडे, शशांक नमन, कोंडाजी कडनर, संतोष बलसाने, नवनाथ वावरे, संपत बुरुंगुले, मंजाबापु साळवे, अमोल गायकवाड, सुरजित खेमनर, रणजीत जाधव, दिपक भगत, रमेश काळे, , बुवाजी खेमनर, राजेंद्र सांगळे, भारत गवळी, संपत गेठे, महेश मांडेकर, संदेश देशमुख यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# करजगाव शिवारात बिबट्या जेरबंद

**जनता आवाज वृत्तसेवा**



**सोनई** : सोनई जवळील करजगाव शिवारातील विटभट्टी जवळील एका विहिरीत बिबट्या दि. ३१ रोजी आढळून आला असल्याने ग्रामस्थांनी या ठिकाणी गर्दी केली. बिबट्याच्या वावरामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये घबराट निर्माण झाली होती. येथे अनेक दिवसांपासून बिबट्यांची दहशत होती. काल सकाळी सागर पांडुरंग गरुड यांच्या विहिरीत बिबट्या पडल्याची माहिती समजल्याने परिसरातून ग्रामस्थ त्या ठिकाणी त्याला पाहण्यासाठी जमा झाले. या घटनेची माहिती वनविभागाला देण्यात आली. दुपारी वनविभागातील कर्मचाऱ्यांनी विहीरीमधून बिबट्याला बाहेर काढून अहिल्यानगर येथे नेले आहे.

काही दिवसांपासून या करजगाव, शिरेगाव, लांडेवाडी, घावटेवस्ती, श्रीरामवाडी, परीसरात बिबट्या आढळून येत असल्यामुळे नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

# जामखेडमधील कलाकेंद्र बनलेत गुन्हेगारांचा अड्डा

## गोळीबारातील आरोपींना अटक न केल्यास बंदचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : जामखेडमध्ये सध्या राजरोसपणे अवैध धंदे हे शहरातील पोलीस निरीक्षक व मुख्याधिकारी यांच्या आशिर्वादाने सुरू आहेत. वेश्या व्यवसाय, मटका, गांज्या, अवैध दारू यामुळे परिसरातील तरूण पिढी बिघडत चालली आहे. सतत गोळीबाराच्या घटना घडत आहेत. यामुळे व्यापारी शहर सोडून चालले आहेत. कालच्या गोळीबाराच्या घटनेतील आरोपींना जर आज अटक झाली नाहीतर उद्या जामखेड शहर कडकडीत बंद ठेवण्यात येईल, असे पत्रकार परिषदेत सामाजिक कार्यकर्ते रमेश आजबे यांनी सांगितले.

रविवारी दि. १ रोजी सायंकाळी दहाच्या सुमारास जामखेड शहरात लघवी करण्याच्या कारणाने गोळीबार झाला. यात एक जण गंभीर जखमी तर एक किरकोळ जखमी झाला आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेच्या पाश्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते रमेश आजबे व जखमी कुणाल पवारचे वडील बंडू पवार यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते म्हणाले की, जाम खेड शहरात सध्या कलाकेंद्र हे गुन्हेगारांचे अड्डे बनले आहेत. कला केंद्राला पोलीस निरीक्षक महेश पाटील म्हणजेच (रंगा) यांच्या आशिर्वादाने कसलीही वेळ नाही. रात्रभर नंगानाच सुरू असतो. डिजेचा थयथयाट, परिसरात वेश्या व्यवसाय, हॉटेलवर सुरू असतो. यामुळे परिसरातील तरूण पिढी बिघडत चालली आहे. व्यापारी शहर सोडून



चालले आहेत. शहरासह तालुक्यात शेकडो अवैध हत्यारे आहेत. अनेक तरूणांकडे अवैध कट्टे आहेत, राजरोसपणे दहशत पसरवितात. लवकरच या रंगाची बदली करावी अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल असे रमेश आजबे यांनी सांगितले. शहरात अवैध धंद्यांचा रात्रभर नंगानाच सुरू असतो. यास पोलीस निरीक्षक, मुख्याधिकारी यांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष आहे. तरूण पिढी बिघडत चालली आहे. वेश्या व्यवसाय, मटका, अवैध दारू, गांज्या हे राजरोसपणे सुरू आहे. व्यापारी शहर सोडून चालले आहेत. दोन्ही अधिकाऱ्यांच्या बदल्या कराव्यात अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी गोळीबाराच्या घटनेतील जखमी कुणाल पवार यांचे वडील बंडू मारूती पवार हॉटेल व्यावसायिक म्हणाले की, माझा मुलगा कुणाल कामानिमित्त अदित्य पोकळे या मित्राकडे गेला होता. यावेळी एक अनोळखी चार चाकी गाडीतून काही दारूच्या नशेतील अनोळखी व्यक्ती उघड्यावर लघवी करू नका इथे महिला आहेत, असे म्हटले याचा राग आल्याने गोळीबार केला यात माझा मुलगा कुणाल पवार जखमी झाला. पोकळे किरकोळ जखमी आहे. हे सगळे आरोपी नशेच्या आहारी होते. कलाकेंद्रामुळे हे अवैध धंदे सुरू आहेत ते ताबडतोब अवैध धंदे बंद करावेत.

### कोण आहेत रंगा- बिल्ला

पोलीस निरीक्षक महेश पाटील व जाम खेड शहरात मुख्याधिकारी अजय साळवे (बिल्ला) यांच्या आशिर्वादाने शहरातील नगरपरिषद गाळ्यात राजरोसपणे अवैध धंदे, मटका, गांज्या सुरू असतो. यास मुख्याधिकारी यांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष आहे. तसेच शहरात मोठ्या प्रमाणात अवैध दारू विक्री सुरू आहे. शहरातील संपूर्ण तरूण पिढी बिघडत चालली आहे. लवकरच या अधिकाऱ्याची बदली करावी, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असे सांगितले.

# खोमणे हिची पोलीस दलात निवड



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : पारनेर तालुक्यातील शिरापूर येथील प्रगतशिल शेतकरी जयश्री व ज्ञानेश्वर खोमणे यांची मुलगी वैष्णवी खोमणे हिची नुकतीच पोलीस खात्यात पोलीस म्हणून निवड झाल्याबद्दल वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

नुकत्याच पुणे येथे पार पडलेल्या हिंदू शेगर धनगर समाज विकास मंचच्यावतीने सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे वाशिमचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते शिरापूरची कन्या वैष्णवी जयश्री ज्ञानेश्वर खोमणे हिची पुणे कारागृह पोलीसपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.यावेळी वाशिम चे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आपल्या भाषणात वैष्णवी खोमणे हिने मिळविलेल्या यशाबद्दल जीवनात जिद्द मेहनत व चिकाटीने यशाचे शिखर गाठता येते, आपल्या आई-वडिलांचे नाव मोठे करत जीवनात यश मिळवा.याप्रसंगी पाहुण्यांचा परिचय व कार्यक्रमाचे आयोजन प्रा. संभाजी साबळे व प्रा. अजय गावडे यांनी केले.



# भंडारदरात पुन्हा पाऊस सुरू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर उत्तर नगर जिल्ह्याला वरदान ठरलेल्या भंडारदरा धरण परिसर आणि पाणलोटात काल रविवारी दिवसभर अधूनमधून पाऊस कोसळत होता. त्यामुळे डोंगरदऱ्यावरील धबधबे पुन्हा सक्रीय झाले असून ओढेनाले खळखळू लागले आहेत. दोन दिवसांपासून पाणलोटात पावसाने काढता पाय घेतला होता. पण काल दुपारपासून सरी कोसळत होत्या. सायंकाळपर्यंत अधूनमधून कमी अधिक प्रमाणात पाऊस कोसळत होता. ११०३९ दलघफू क्षमतेच्या भंडारदरा धरणात २७४६ दलघफू (२४.८८ टक्के) पाणीसाठा आहे. निळवंडेत २३६६ दलघफू (२८.४१टक्के) आहे. आढळातील पाणीसाठा ५१.७० टक्के १०६० दलघफू क्षमतेच्या आढळा धरणातील पाणीसाठा ५४८ दलघफू (५१.७० टक्के) झाला होता.

# प्रवरेच्या कृषीदूतांचे उंबरी बाळापूर येथे स्वागत



**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : संगमनेर तालुक्यातील उंबरी बाळापूर येथे कृषी महाविद्यालय, लोणी येथील कृषीदूतांचे आगमन झाले आहे. यावेळी गावातील ग्रामस्थांनी आणि शेतकऱ्यांनी या कृषीदूतांचे स्वागत केले.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा कृषी शास्त्र संस्थेअंतर्गत असणाऱ्या कृषी महाविद्यालय, लोणी येथे हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुष्मिता विखे पाटील, कृषी संचालक डॉ. उत्तमराव कदम आणि कृषी महाविद्यालय लोणीचे प्राचार्य डॉ. दिलीप महाले कार्यक्रम समन्वयक डॉ. रमेश जाधव, कार्यक्रम अधिकारी डॉ. विक्रम अनाप आणि प्रा. अक्षया वाळुंज यांच्या मार्गदर्शनाखाली अभिजीत शेळके, रोहन चोपडे, सिद्धेश दराडे, रोहित भापकर, आविष्कार बडधे, प्रज्ञेश गव्हाने हे उंबरी बाळापूर येथील शेतकऱ्यांचे अनुभव जाणून घेत त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. याप्रसंगी ग्राम पंचायत उंबरी बाळापूरचे सरपंच अर्चना भुसाळ, उपसरपंच किसन खेमणर, ग्रामविकास अधिकारी संग्राम चांडे व इतर ग्रामस्थ, शेतकरी यांनी स्वागत केले. कृषी शिक्षणाच्या माध्यमातून हे कृषीदूत येथील शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती, बीजप्रक्रिया, गांडूळखत उत्पादन, चारा पिके, दुग्ध व्यवसाय, बायोगॅस आदी संदर्भात माहिती देणार आहे.

# पठारवाडी तंटामुक्तीच्या अध्यक्षपदी पठारे



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : पठारवाडी महात्मा गांधी तंटा मुक्ती समितीच्या अध्यक्षपदी सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक बबन शंकर पठारे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

पठारवाडी महात्मा गांधी तंटा मुक्ती समितीच्या अध्यक्षपदासाठी सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक पठारे, गावचे माजी उपसरपंच मारुती आनंदा पठारे व सेवा संस्थेचे माजी चेअरमन सुखदेव बबन पठारे हे तिघे जण इच्छुक होते. परंतू पारनेर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती किसनराव सुपेकर, सरपंच भास्करराव सुपेकर, उपसरपंच माजी सरपंच भिका पठारे व इतरांनी मध्यस्ती केल्याने सुरुवातीला माजी उपसरपंच मारुती पठारे व तदनंतर माजी चेअरमन सुखदेव पठारे या दोघांनी सहमती दाखवत गावात एकोपा राहावा, म्हणून मनाचा मोठेपणा दाखवत माघार घेतल्याने सेवानिवृत्त पोलिस निरीक्षक बबन पठारे यांचा अध्यक्ष पदाचा मार्ग मोकळा झाला.

# खैरी निमगावमध्ये पिकअप आणि ढंपरचा अपघात

## वाळू वाहतूक करणाऱ्या बेफाम ढंपरला आवर घालणार कोण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर कोपरगाव रोडवर -राजेंद्र बनकर यांच्या साईअमृत प्लॅन्टजवळ वाळुच्या ढंपरचा व दारू घेऊन चाललेल्या पिकअप गाडीची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात दोन्ही वहानाचे मोठे नुकसान झाले. सुदैवाने यात कोणती ही जिवीतहानी झाली नाही.

नायगाव येथे शासकीय वाळू लिलाव सुरू असल्याने नायगाव येथील शासकीय वाळू डेपोवरून श्रीरामपूरकडे जाणारा वाळुने भरलेला ढंपर क्रमांक (एमएच १४ डिएम ६४५२) ची श्रीरामपूरहून पुणतांबा कोपरगावकडे जाणाऱ्या दारूने भरलेला पिकअप क्रमांक (एम एच १७ बिवाय ८६४४) ची समोरासमोर धडक झाली. यात दोन्ही वाहनाचे नुकसान झाले. परंतु मात्र, सुदैवाने कुठलीही जिवीतहानी झाली नाही. धडक होऊन ढंपर रस्त्याच्या खाली घुसला तर पिकअप गाडीतील अनेक कंपनीच्या बिअरच्या बाटल्या असलेल्या खोक्यांचे नुकसान होऊन रस्त्यावर काचांचा खच पडला होता. दरम्यान अनेक तळीरामांनी या अपघाताचा फायदा घेत बिअरच्या बाटल्या पळवल्या.



अपघातामुळे रस्त्यावर काही काळ वाहतुकीची कोंडी झाली होती. या दरम्यान श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्याचे पीएसआय मुरकुटे, पीएसआय डौले, पोलीस हेडकॉन्स्टेबल मोहन शिंदे, रन्नवरे आदी घटनास्थळी दाखल होत. पोलीसांनी शेजारी असलेल्या शेतात देखील बिअरच्या बाटल्यांचा शोध घेतला. दरम्यान रात्री उशिरापर्यत पोलीसात या घटनेची नोंद झालेली नव्हती.

# शिवूर येथे अहिल्याबाई होळकर यांची जयंती उत्साहात



**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर** : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्ताने शिवूर येथे संत शंकर स्वामी मंगल कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे शेतीविषयक धोरण व शासन व्यवस्था ह्या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते


यावेळी उदय देवळाणकर यांचे सखोल असे मार्गदर्शन यावेळी शेतकरी बांधवांना लाभले प्रसंगी माझ्यासह जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष एकनाथराव जाधव साहेब, दिनेश परदेशी (मा. नगराध्यक्ष वैजापूर) ज्ञानेश्वर जगताप (संचालक बाजार समिती) सुनील पैठणपगारे (मा. जि. प. सदस्य), जिल्हा सचिव गोरख घायवट, मंजाहरी गाढे, कल्पना पवार, अशोक जाधव, नारायण तुपे, प्रकाश भोपळे, रामेश्वर जाधव, केतन आव्हाळे, उदय सोनवणे, अशोक शेळके, श्रावण नळे, ज्ञानेश्वर मतसागर, देविदास मतसागर, प्रमोद गुळे, नानासाहेब सुर्येवंशी, शिवाजी गोरे, शिवाजी राजे साळुंखे, आकाश बागुल, विपीन साळे, योगेश घायवट, ज्ञानेस्वर कदम, दीपक गाजरे, प्रकाश तुपे उपस्थित होते.

# साईबाबा रुग्णालयात अवघड हृदय शस्त्रक्रिया यशस्वी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी** : येथील श्री साईबाबा संस्थानच्या रुग्णालयात एक अत्यंत गुंतागुंतीची हृदय शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली असून, रुग्ण पूर्णपणे बरा होऊन सुखरूप घरी परतला आहे.

नांदेड जिल्ह्यातील चांडोळा गावचे ६५ वर्षीय प्रल्हाद महाजन साखरे यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने त्यांच्या हृदयाच्या वॉलमध्ये छिद्र निर्माण झाले होते. या गुंतागुंतीच्या स्थितीत अनेक नामांकित रुग्णालयांमध्ये प्रयत्न करूनही, रुग्णाच्या शस्त्रक्रियेतील धोका पाहता डॉक्टरांनी नकार दिला होता.



शेवटचा उपाय म्हणून त्यांनी श्री साईबाबा रुग्णालयात धाव घेतली. येथेही संभाव्य धोका स्पष्ट करून डॉक्टरांनी कुटुंबीयांचा निर्णय मागितला. साईबाबांवरील श्रद्धेने प्रेरित होऊन कुटुंबीयांनी शस्त्रक्रियेस परवानगी दिली. रुग्ण पूर्णपणे बरा होऊन डिस्चार्ज झाला. त्यांच्या बंधूंनी, खुशालराव साखरे यांनी डॉक्टरांचे विशेष आभार मानले आणि आनंदाश्रूंनी आपली भावना व्यक्त केली.या यशस्वी प्रयत्नाबद्दल संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर (भा.प्र.से), उपमुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे, वैद्यकीय संचालक लेफ्ट. कर्नल डॉ. शैलेश ओक आणि उप वैद्यकीय संचालक डॉ. प्रितम वडगावे यांनी संपूर्ण टीमचे अभिनंदन केले.२४ मे २०२५ रोजी रुणाला दाखल करण्यात आले आणि कार्डियाक सर्जन डॉ. श्रेयस पोतदार, भुलतज्ञ डॉ. गायत्रीलक्ष्मी नागपुरे, अतिदक्षता तज्ज्ञ डॉ. विजय नरोडे, न्युरोसर्जन डॉ. मुकुंद चौधरी आणि हृदयरोग तज्ज्ञ डॉ. निलेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ही शस्त्रक्रिया यशस्वी झाली. श्री साईबाबा रुग्णालयात ही अशी पहिलीच शस्त्रक्रिया होती.

# अरुणाथगिरींच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिरसगाव** : उंदीरगाव येथील दहावी उत्तीर्ण विद्यार्थिनींचा सत्कार आडबंगनाथ मठाधिपती अरुणाथगिरी महाराज यांच्या हस्ते करण्यात आला. दिव्या सतीश नाईक, सोनाली अरुण बांद्रे, अदिती शरद आव्हाड, संस्कृती अरुण गायके, साक्षी मनोज टाक, मयूर भगवान सोमवंशी यांचा सन्मान संभाजीनगर हायकोर्टचे वकील व शेतकरी संघटनेचे उपाध्यक्ष अजित काळे यांच्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त उंदिरगाव येथील मुलींचा सत्कार करण्यात आला. सत्कार प्रसंगी शेतकरी संघटनेचे सतीश नाईक, बबन नाईक, सोपान नाईक, सागर गिऱ्हे, बापू वेताळ, ओम नाईक, शिवाजी आढाव, शरद आव्हाड, अशोक गुळवे, अनिल रोकडे, संतोष वाकचौरे, प्रतीक गायके आदी उपस्थित होते.

# हुमणी किडीचा वेळीच बंदोबस्त करा : भरत दवंगे

## विकसित कृषी संकल्प अभियान जनजागृती अभियान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : जिल्ह्यामध्ये नुकताच बऱ्याच ठिकाणी वादळी पाऊस होऊन गेलेला असून या पावसामुळे या जमिनीत सुप्तावस्थेत असलेले हुमणीचे भुंगेरे बाहेर पडण्यास सुरुवात झालेली आहे आणि या भुंगेऱ्यांचे वेळीच नियंत्रण केले तरच पावसाळ्यामध्ये हुमणी अळीचा प्रादुर्भाव वाढणार नाही, अशी माहिती कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वरचे पीक संरक्षण विभागाचे प्रमुख भरत दवंगे यांनी दिली.

शेतकऱ्यांमध्ये आधुनिक तंत्रज्ञान आणि नवीन बियाणांच्या जाती बद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी २९ मे ते १२ जून या कालावधीत विकसित कृषी संकल्प अभियान ही देशव्यापी मोहीम सुरू झाली. संस्थेचे अध्यक्ष तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालीनी विखे पाटील आणि संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे, संचालक डॉ. उत्तमराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वर, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन, केंद्र, आणि राज्य पातळीवरील संस्था, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी आणि आत्मा अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर जिल्ह्यातील राहाता, श्रीरामपूर, राहुरी, कोपरगाव, अकोले, संगमनेर आणि पारनेर



या तालुक्यांमध्ये ही मोहीम सुरु आहे. या अंतर्गत आयोजित जनजागृती कार्यक्रमात दवंगे बोलत होते. यावेळी कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख, एन. आय. ए. एम. चे डॉ. विजय काकडे, डॉ. गोरक्ष वाकचौरे, के. व्ही. के. चे शास्त्रज्ञ शांताराम सोनवणे, डॉ. प्रियंका खर्डे, डॉ, विलास घुले, सज्जला लांडगे, डॉ. विठ्ठल विखे, कैलास लोंढे आणि बचत गटातील महिला, शेतकरी उपस्थित होते.

दवंगे यांनी सांगितले की, दरवर्षी पहिला पाऊस पडल्यानंतर या हुमणीची भुंगेरे जमिनीतून बाहेर पडतात आणि रात्रीच्या वेळी कडुलिंब, बोर, बाभूळ किंवा चिंचेच्या झाडावर एकत्रित जमा होतात आणि झाडांचा पाला खातात. सकाळ झाल्याबरोबर हे भुंगेरे पुन्हा जमिनीत जातात आणि यातील मादी भुंगेरा जमिनीत अंडी टाकण्यास सुरुवात करतो. हे भुंगेरे सर्वसाधारण तीस दिवस जगतात आणि दररोज दोन अंडी जमिनीत टाकतात. या अंड्यामधून दहा ते पंधरा दिवसानंतर हुमणीची अळी जन्म घेते आणि एकदा जन्म झाल्यानंतर ही ळी जवळजवळ आठ महिने जमिनीमध्ये जिवंत राहते.

ऑगस्ट सप्टेंबर महिन्यामध्ये जर या हुमणी अळीचा प्रादुर्भाव जास्त वाढला तर पिकांमध्ये ठिबकच्या साह्याने किंवा वाहत्या पाण्यासोबत फिप्रोनील ४० टक्के अधिक इमिड्याक्लोप्रिड ४० टक्के हे संयुक्त कीटकनाशक १५० ग्रॅम प्रति एकरी शेतात सोडावे, असे आवाहन करत त्यांनी करत विविध पिकांतील रोग-किड नियंत्रण विषयी दवंगे यांनी मार्गदर्शन केले.

# कॅलिडोस्कोप



**असा स्पर्श हवा**

एक स्पर्श असा हवा
मनाच्या गाभ्यात शिरणारा
हळवेपणाने जोजावून
सुखाचे तरंग उठवणारा
कोणी तरी असं झुकावं
पडलेल्याला सावरण्यासाठी
पुन्हा निळाई पसरु यावी
स्वत:चं प्रतिबिंब पाहण्यासाठी

## अद्भूत सौंदर्याने नटलेला तारकर्ली बीच!

**अ**थांग समुद्राचे अद्भुत सौंदर्य, मनाला भुरळ घालणारा स्वच्छ किनारा, निसर्गाची साद अन् हातात जोडीदाराचा हात... आणखी काय पाहिजे आयुष्यात? महाराष्ट्रातील स्वर्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या ठिकाणाला तुम्ही एकदा तरी भेट द्यायलाच हवी. येथील पाणी अगदी स्वच्छ आहे. हे ठिकाण अतिशय शांत आहे. इथला सूर्यास्त आणि सूर्योदय बघण्यासारखा आहे. कारण हे ठिकाण तुम्हाला शहराच्या कोलाहलापासून दूर नेईल. तारकर्ली हे खूप सुंदर ठिकाण आहे. ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गाव आहे. स्वच्छ समुद्रकिनारे हे या गावाचे वैशिष्ट्य आहे. इथे तुम्हाला कुठेही घाण दिसणार नाही. याव्यतिरिक्त तारकर्ली बीचपासून सहा किलोमीटर अंतरावर आचरा बीच हा आणखी एक बीच आहे. या बीचचे वैशिष्ट्य म्हणजे येथील थंड हवामान. या ठिकाणाचे धार्मिक महत्त्वदेखील खूप जास्त आहे. कारण येथे भगवान रामेश्वराचे २६० वर्षे जुने मंदिर बांधले आहे. ते पाहण्यासाठी लांबून पर्यटक येतात. तारकर्ली गावाचा भूतकाळ ऐतिहासिक आहे. शिवरायांच्या काळात बांधलेला एक सिंधुदुर्ग किल्ला आहे. १०० वास्तुविशारद पोर्तुगीज आणि १००० पेक्षा जास्त मजूरांनी या किल्ल्याचे बांधकाम केले. या किल्ल्यामध्ये अनेक देवदेवतांची मंदिरे बांधण्यात आली आहेत.

समुद्रकिनाऱ्यांव्यतिरिक्त, येथील सुंदर तलाव पाहण्याचा आनंद घेऊ शकता. दहा एकरांवर पसरलेला हा तलाव बांधण्यासाठी राजा नागेश देसाई यांनी १५३० मध्ये दोन गावे बुडवली होती असे म्हणतात. तारकर्ली येथे कोणतेही रेल्वे स्थानक नाही; परंतु तारकर्लीपासून ३२ किलोमीटर अंतरावर असलेल्या कुडाळ रेल्वे स्थानकाद्वारे आजूबाजूच्या भागात सेवा दिली जाते. याशिवाय



सावंतवाडी रेल्वे स्थानक ३९ किलोमीटर आणि कणकवली रेल्वे स्थानक ५२ किलोमीटर अंतरावर आहे. तारकर्ली समुद्रकिनारी जाण्यासाठी बस, ऑटो आणि कॅब मिळतात. स्कूटीनेही या बीचवर जाऊ शकता. स्कूटर ३०० ते ४०० रुपयांना भाड्याने मिळते. येथून सर्वात जवळचे विमानतळ दाबोलिम, गोवा आहे. ते फक्त १३२ किलोमीटर अंतरावर आहे. या विमानतळावरून चेन्नई, हैदराबाद, कोलकाता, बंगलोर आणि इतर मोठ्या शहरांसाठी उड्डाणे उपलब्ध आहेत.



## पत्नीच्या सेवेमुळे पती कोमातून बाहेर

**प**ती–पत्नीच्या नात्यात प्रेम आणि विश्वास सर्वात महत्त्वाचा असतो. कधीकधी पती–पत्नीमध्ये वाद होतात; परंतु विश्वास आणि समर्पणाचा प्रश्न येतो, तेव्हा दोघेही एकमेकांना पूर्ण पाठिंबा देतात. शेवटी आयुष्य म्हणजे प्रत्येक सुख–दुःखात एकमेकांना साथ देणे. चीनचे असेच एक प्रकरण खूप चर्चेत होते. येथे एका महिलेने १० वर्षे पतीची अशी सेवा केली, की तो कोमातून बाहेर आला. त्यामुळे पत्नीच्या आनंदाला पारावार उरला नाही. हे प्रकरण सोशल मीडियावर व्हायरल झाले, तेव्हा लोकांना धक्का बसला.

हे प्रकरण चीनच्या अनहुई प्रांतातील आहे. या महिलेचे नाव सन होंगक्सिया आहे. २०१४ मध्ये तिच्या पतीला हृदयविकाराचा झटका आला आणि तो कोमामध्ये गेले. त्याच्या बरे होण्याची कोणतीही आशा दिसत नव्हती; परंतु होंग्झियाला खात्री होती, की तिचा नवरा एक दिवस नक्कीच बरा होईल. या आशेने, ती त्याची सेवा करत राहिली. लोकांनी तिला तिचा नवरा सोडण्यास सांगितले. कारण तो कधीही बरा होणार नाही; परंतु हाँगक्सियाने पतीला सोडण्यास नकार दिला आणि ढसाढसा रडू लागली. हांग्झियाचा एक भावनिक व्हिडिओ चीनी 'सोशल मीडिया'वर व्हायरल झाला. त्यात ती तिच्या पतीच्या शेजारी बसलेली दिसत आहे, तर तिचा नवरा बेडवर पडलेला होता; परंतु तो शुद्धीत होता. ती त्याला गेल्या काही वर्षांमध्ये घडलेल्या घटना सांगते तेव्हा तिला रडायला येते. ती म्हणते, मी खूप थकले आहे, पण आमचे कुटुंब पुन्हा एकत्र आल्याने माझ्या समर्पणाचे सार्थक झाल्याचे मला वाटते.

हाँग्झियाला पतीला अचानक हृदयविकाराचा झटका आला तो क्षणही आठवतो. तेव्हा ती म्हणते, माझ्या दोन मुलांमुळे हे शक्य झाले, त्यांनी मला निराश होण्याऐवजी खंबीर होण्याची प्रेरणा दिली. मला त्यांच्यासाठी एक चांगले उदाहरण ठेवायचे होते. होंग्झियाने तिच्या सासऱ्यांनी तिच्या समर्पणाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. तू फक्त माझी सून नाहीस, तर तू मुलीपेक्षा जास्त आहेस, कोणीही इतके करू शकत नाही, असे ते म्हणाले.

## वेटरने भरला ग्राहकांना दम!



हॉटेलमध्ये गेल्यावर ग्राहक तिथल्या वेटर आणि इतर कर्मचाऱ्यांशी चुकीचं वागतात. त्यांना बोल लावतात. थोडीशी जरी चूक झाली तरी हमरीतुमरीवर येतात. नोकरी जाऊ नये यासाठी वेटर आणि इतर कर्मचारी गप्प बसतात, ग्राहकांची माफी मागतात. युक्रेनमधल्या एका रेस्तराँमध्येही ग्राहक आणि वेटर्सचं भांडण झालं. पण इथे ग्राहक नाही तर वेटर आक्रमक झाले. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल होत आहे. युक्रेनमधल्या एका रेस्तराँमध्ये दोन महिला जेवायला आल्या होत्या. त्यांचा तिथल्या वेटरशी वाद झाला. त्या वेटरच्या हातात केक होता. त्याच्यासोबत असलेल्या वेटरच्या हातातही केक होता. महिला आक्रमक झाल्याचं पाहून वैतागलेल्या वेटरने हातातला केक महिलेच्या तोंडावर मारला. तिचं तोंड केकने भरून गेलं. यामुळे तिच्यासोबत असलेल्या महिलेला प्रचंड राग आला. तिने त्या वेटरच्या तोंडावर ग्लासमधलं पाणी फेकलं. आपल्या सहकाऱ्याशी झालेलं गैरवर्तन सहन न झाल्याने दुसऱ्या वेटरने त्याच्या हातातला केक दुसऱ्या महिलेच्या तोंडावर मारला. या सगळ्या प्रकारामुळे रेस्तराँमध्ये गोंधळ वाढला. अनेकांनी या घटनेचा व्हिडिओ घ्यायला सुरूवात केली. या महिलांनी रेस्तराँच्या मॅनेजरकडे तक्रार केली. पण त्याने वेटरचीच बाजू घेतली. रेस्तराँच्या कर्मचाऱ्यांशी ग्राहक चुकीचं वर्तन करत असल्याचं सांगत त्याने या महिलांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केलं. हे प्रकरण जरा विचित्रच म्हटलं पाहिजे.

## पायांमुळे होते लाखोंची कमाई



**को**णाच्या डोक्यातून कोणती सुपीक कल्पना निघेल याचा नेम नाही. आजच्या जगात कोणाला दोन वेळचं अन्न मिळत नाही तर कोणी अचानक मालामाल होऊन जातो. आता पायात घातलेल्या, दुर्गंधी येणाऱ्या मोज्यांचं आणि बुटांना कोणी विचारेल तरी का? पण एक मुलगी असे दुर्गंधी येणारे बूट आणि मोजे ऑनलाईन विकते आहे. रोक्सी साईक्स असं या महिलेचं नाव आहे. दुर्गंधी येणारे मोजे आणि बूट विकून ती वर्षाला एक लाख पाउंड म्हणजे ७३ लाख रूपये कमावते. एका इंस्टाग्राम पेजवरून या अनोख्या व्यवसायाची सुरूवात झाली. दुर्गंधी येणारे बूट आणि मोजे विकायचा विचार कोणाच्याही मनात येणार नाही. पण रोक्सीला ही कल्पना सुचली. सुंदर पायांमुळे ती हे करू शकली. रोक्सीने इन्स्टाग्राम अकांउट सुरू केलं. पायांवर प्रेम करणारे किती लोक आहेत हे तिला जाणून घ्यायचं होतं. एका महिन्याच्या आत तिला दहा हजारांपेक्षा जास्त फॉलोअर्स मिळाले. मग काही व्यापाऱ्यांनी तिच्याशी संपर्क केला. मोज्यांच्या एका जोडीसाठी २० पाउंड आणि बुटांच्या जोडीसाठी २०० पाउंड देण्याचं ठरलं आणि रोक्सीला मार्ग मिळाला. तिचा व्यवसाय वाढत गेला. रोक्सी महिन्याला ८००० पाउंड कमावते. भारतीय चलनात याचं मूल्य साडेसात लाख रूपये होतं. पायांच्या माध्यमातून कमाईचे मार्ग मिळवण्याचे धडे रोक्सी काही मॉडेल्सना देते आहे. रोक्सीला आता आपल्या भविष्याची अजिबात चिंता नाही.

## एकाच वेळी पाच मुली!

**बि**हारमध्ये एका महिलेने एकाच वेळी पाच मुलींना जन्म दिला. कोणतीही स्त्री एक, दोन किंवा फार तर तीन मुलांना जन्म देते; परंतु हे प्रकरण खरोखरच आश्चर्यकारक आहे. ताहिरा आलम असे पाच बाळांना जन्म देणाऱ्या महिलेचे नाव असून ती याआधी त्यांना एक मुलगा आहे. या महिलेने एकत्र पाच मुलींना जन्म दिल्याने तिच्या घरात आनंदाचे वातावरण आहे.

ती महिला दोन महिन्यांची गरोदर असताना तपासणीसाठी डॉक्टरांकडे गेली. तेव्हा डॉक्टरांनी तिला पोटात चार मुले आहेत, असे सांगितले होते. तिने पुन्हा तपासणी केली, तेव्हा तिच्या पोटात पाच मुले आहेत, असे दिसले. यानंतर डॉक्टरांनी तिला घाबरण्यासारखे काही नसल्याचे सांगितले. प्रसूतीची वेळ आली तेव्हा रझा नर्सिंग होमच्या डॉ. फरजाना नूरी आणि फरहाना नूरी यांनी मिळून ताहिरा आलमची प्रसूती केली. रझा नर्सिंग होमच्या डॉक्टरांनी सांगितले, की ही केस आमच्यासाठी खूप आव्हानात्मक होती. आम्ही तिला धीर दिला. तांत्रिक मदत आणि समजूतदारपणाने आम्ही महिलेची प्रसूती केली. आता मुले आणि त्यांची आई ताहिरा पूर्णपणे सुखरूप आहेत.

डॉ. फरजाना आणि फरहाना नुरी यांनी सांगितले, की आम्ही ताहिराच्या कुटुंबाचे अभिनंदन करतो. यापूर्वीही अशी प्रकरणे समोर आली आहेत. त्यात अनेक महिलांनी एकाच वेळी २ ते ३ मुलांना जन्म दिला आहे. भोपाळमध्ये एका ४२ वर्षीय महिलेने एकाच वेळी तीन मुलांना जन्म दिला. भोपाळच्या कैलाशनाथ काटजू हॉस्पिटलमध्ये ही प्रसूती झाली. भोपाळ शहरातील भीम नगर भागात राहणारी ४२ वर्षीय सुगी निपुत्रिक असल्यामुळे खूप त्रासली होती. आय.व्ही.एफ. तंत्राने उपचार केल्यावर तिला पुत्ररत्न प्राप्त झाले.





## हसता हसता त्या पडल्या खड्ड्यात

**सी**तामातेला पृथ्वीने आपल्या पोटात घेतलं. ती पृथ्वीमध्ये सामावून गेली. लाखों वर्षांपूर्वी रामायणात घडलेली ही घटना. पण आजच्या काळात पृथ्वी कोणाला आपल्या पोटात घेईल का? तुर्कीत घडलेल्या एका घटनेचा व्हिडिओ पाहून हेच म्हणावं लागेल. त्याचं झालं असं की, तुर्कीमधल्या एका घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला. यात दोन महिला अचानक पृथ्वीच्या पोटात सामावत असल्याचं दिसून येत आहे. ही तुर्कीतल्या दियरबकीरमधली घटना आहे. ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. नेहमीप्रमाणे आरामात एकमेकींशी गप्पाटप्पा करत, हसत जाणाऱ्या दोन महिला अचानक पृथ्वीच्या पोटात सामावल्या. तुर्कीतल्या सुरक्षा दलाने हा व्हिडिओ जारी केला आहे. आपलं काम संपवून घरी जात असलेल्या सुजैन कुदै आणि ओजलेम दयमाज यांच्या बाबतीत ही भीतीदायक घटना घडली. अर्थात रस्ता खचल्यामुळे या दोघी आत पडल्या. त्यांना सुरक्षितरित्या बाहेर काढण्यात आलं. या दोघींना किरकोळ जखमा झाल्या. या रस्त्याच्या दुरूस्तीच्या कामाला लगेचच सुरूवात झाली.



## जंगल श्वास घेतंय!

**झा**डं सजीव असतात. तीही श्वास घेतात, ऑक्सिजन बाहेर सोडतात. कार्बन डाय ऑक्साइड शोषून घेतात. पण या प्रक्रियेत झाडं श्वासोच्छवास करताना दिसत नाहीत. पण कॅनडामधल्या सेक्रे कोइर भागतलं जंगल अचानक श्वास घेऊ लागलं. झाडंझुडुपं हलू लागली. हे सगळं एका व्हिडिओमध्ये रेकॉर्ड झालं. हा व्हिडिओ व्हायरल झाला. जंगलाला अशा प्रकारे श्वास घेताना बघून सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला. या व्हिडिओमध्ये जंगलाखालची जमीन हलत असल्याचं दिसून येत आहे. यामुळे झाडं श्वास घेत असल्याचा भास आपल्याला होतो. आता प्रत्यक्षात जंगल अशा प्रकारे श्वास घेऊ शकतं का? तर नाही. मग काय घडलं असावं? हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर शास्त्रज्ञांची टीम या ठिकाणी रवाना झाली. त्यांनी शोध घेतला. त्यांच्या असं लक्षात आलं की सोसाट्याच्या वाऱ्यामुळे जंगल श्वास घेत असल्याचा भास होत आहे. सोसाट्याचा वारा सुटल्यानंतर झाडाचा वरचा भाग हलू लागला. सोसाट्याचा वारा सुटल्यावर पृथ्वीवरची माती नरम पडते. झाडांची मुळं मातीशी घट्ट जोडलेली असतात. पण वाऱ्यामुळे माती नरम पडल्यामुळे मुळं थोडी कमकुवत होतात. वारा सुटल्यानंतर खोड, बुंदे, फांद्या, पानं सगळं जोरात हलू लागतं. त्यामुळे जंगल श्वास घेत असल्याचा भास होतो, असा खुलासा शास्त्रज्ञांनी केला आहे. सोशल मिडियावर कोणता व्हिडिओ व्हायरल होईल याचा नेम नसतो. पण जंगल श्वास घेत असल्याच्या या व्हिडिओने सगळ्यांनाच आश्चर्याचा धक्का दिला.

## महागडी मद्यं

**म**द्यपान आरोग्यासाठी हानीकारक असतं. पण जगभरात मद्यपींची संख्या कमी नाही. उंची आणि महागडी दारूही बाजारात मिळते. पट्टीचे मद्यपी अशी दारू खरेदीही करतात. दिग्गज आणि श्रीमंतांच्या घरांमध्ये पार्ट्यांना महागडी दारू आणली जाते. विशिष्ट प्रकारची दारू खूपच प्रसिद्ध असते. अनेक मोठ्या कंपन्या दारू तयार करतात. जगभरात विविध प्रतींची दारू उपलब्ध असते. या दारूच्या किंमती बघून आपले डोळे पांढरे झाल्याशिवाय राहणार नाहीत.

* वियन बॉर्न सिकॉर्स ऐल ही जगातली सर्वात महागडी बियर आहे. ही बियर खरेदी करण्यासाठी तुम्हाला ७८ हजार रूपये खर्च करावे लागतील.

* द विंन्स्टन कॉकटेलची किंमत तब्बल नऊलाख रूपये आहे.

* शॅटियू डी क्यूम नावाची वाईन खरेदी करण्यासाठी तुम्हाला ८५ लाख रूपये खर्च करावे लागतील.

* पेनफोल्डन एम्पूल ही सर्वात महागडी रेड वाईन आहे. पेनच्या आकाराच्या बाटलीत मिळणाऱ्या या वाईनची किंमत एक कोटी ११ लाख रूपये आहे.

* अममांड डी ब्रिगनॅक मिडास ही जगातली सर्वात महाग शँपेन आहे. अत्यंत आकर्षक बाटलीत ही शँपेन मिळते. याची किंमत एक कोटी चाळीस लाख रूपये एवढी आहे.



